# कृष्णार्पणमस्तु

KRISHANARPANMASTU Title-Code: MAHMAR52590

Volume : 2 | Issue : 1 | Marathi Monthly | Thane, 1 July 2024 to 31 July - 2024 | Pages 16 | Price : 10/-

# राजन राजे यांच्या नेतृत्त्वाखाली औद्योगिकविश्वात आणखी एक मोठा चमत्कार...

## रबाळे एमआयडीसीतील ‘हिवा इंडिया’ कंपनीतील २४२ कामगारांना तब्बल १४,५०० रुपयांची भरघोस पगारवाढ...सलग ‘पाचवा त्रैवार्षिक-करार’!




### ‘धर्मराज्य पक्ष’प्रणित ‘धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा’चा, ऐतिहासिक त्रैवार्षिक-करार संपन्न

**नवी मुंबई (प्रतिनिधी) : भारतातील पहिलावहिला निसर्ग-पर्यावरणस्नेही हरित पक्ष अशी मान्यता असणारा व “Zero Tolerance Towards Corruption and Exploitation Of Man and Nature”, असं ब्रीद असणाऱ्या ‘धर्मराज्य पक्षा’चे संस्थापकीय अध्यक्ष आणि अवघ्या औद्योगिकविश्वात ‘कामगार-हृदयसम्राट’ अशी ख्याती असणारे, ‘धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा’चे अध्यक्ष मा. राजन राजे यांनी, अतिशय प्रतिकूल परिस्थितीत (कंपनीला गेल्या दिडदोन वर्षांपूर्वी एका व्यवहारातून फार मोठा आर्थिक-फटका बसल्यानंतरही)...देशातील प्रस्थापित निर्मम-शोषक भांडवली-व्यवस्थेच्या छाताडावर पाय ठेऊन, पुन्हा एकदा आपल्या नावलौकिकाला साजेसा असा, ‘चमत्कार’ घडवून आणला आहे!**

...चमत्कार असा की, ४ कामगारघातकी कायद्यांनी बनलेल्या ‘काळ्या कामगार-संहिते’अंतर्गत समस्त कामगार-कर्मचारीवर्गावर लादल्या गेलेल्या सद्यस्थितीतल्या ‘गुलामगिरी’त... जेवढा मासिक-पगार (विशेषतः, कंत्राटी-कामगारांना म्हणजेच, ‘आधुनिक-गुलामां’ना, १२ तासाला १२ हजार पगार, इतका तुटपुंजा मिळणारा पगार विचारात घेता) हल्ली मिळत नाही; तेवढी नुसती थेट वेतनवाढ ‘हिवा-कामगारां’ना मिळालेली आहे.

**नवी मुंबईस्थित रबाळे एमआयडीसीमधील ‘हिवा इंडिया’ कंपनी; ही वाहतूक, बांधकाम, खाणकाम, अवजडसाहित्य-हाताळणी वगैरे क्षेत्रांसाठी टीपर्स, हॉक-लोडर्स, कॉंपॅक्टर्स यासारखी ‘हायड्रॉलिक-उपकरणे’ उत्पादित करणारी जगभरातील ख्यातनाम कंपनी होय.**

**या हिवा-कंपनीतील कामगार सदस्यांना, या त्रैवार्षिक कराराअंतर्गत, सरासरी तब्बल १४,५०० रुपयांची भरघोस पगारवाढ मिळालेली आहे. विशेष म्हणजे, ‘CTC या व्यवस्थापकीय-फसव्या संकल्पने’वर आधारित ही पगारवाढ बनावट नसून, सर्व कामगारांना समानपद्धतीने (Flat) थेट पगारवाढ देण्यात आलेली आहे...**

...विशेष बाब म्हणजे, कामगार-कर्मचारीवर्गाच्या संदर्भात, या देशातील ‘‘प्रगती-समृद्धीची गंगा उलटी वहात असताना’’, प्रवाहाविरुद्ध पोहून जात प्रचलित व्यवस्थेला आव्हान देणारी व कामगारविश्वाच्या हितार्थ ‘मूलगामी-बदला’चा संदेश देणारी...आपली अदम्य-साहसी परंपरा कायम राखताना, कामगार-हृदयसम्राट राजन राजे यांनी कंपनीतील उरल्यासुरल्या, हाताच्या *...पृष्ठ क्र. ४ वर*

---

अंतरंग



भाजप आणि संघाच्या केडर: एक विश्लेषण
आनंद शितोळे
पृष्ठ क्र. ८



लाखो वर्षांपूर्वी माणसाची शेपटी गळून पडली आणि अलिकडेच, त्याची ‘जीभ’ही गळून पडलीय!
...राजन राजे
पृष्ठ क्र. ९



एक पत्थर तो तबियत से उछालो यारों...
लीना पांढरे
पृष्ठ क्र. ११


# मासुंदा तलावाभोवती कायमस्वरूपी सुरक्षा-रक्षक नेमण्याची 'धर्मराज्य पक्षा'ची मागणी!

## ठाणे न्यायालयाच्या १९९८ मधील आदेशाकडे, ठाणे महापालिकेचे २६ वर्षांनंतरही दुर्लक्षच...

**ठाणे (प्रतिनिधी) : तलावांचे शहर अशी ख्याती असलेल्या ठाणे शहरातील मासुंदा तलावाभोवती सध्या गर्दुल्ल्यांचा विळखा पडलेला असून, यासंदर्भातील एक चित्रफित समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्याने, ठाणेकर नागरिकांच्या तीव्र प्रतिक्रिया उमटताना दिसून येत आहेत. मासुंदा तलावाचा परिसर हा, स्वच्छ रहावा यासाठी, आतापर्यंत अनेकदा तलावाचे सुशोभिकरण करण्यात येऊन, त्यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च करण्यात आलेला आहे. मात्र, अस्वच्छतेसोबतच आता, तलाव परिसरात गर्दुल्ल्यांचा वावर वाढल्यामुळे, फेरफटका मारण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना याचा मनस्ताप सहन करावा लागत आहे. याच पार्श्वभूमीवर ठाणे महानगरपालिकेचे माजी महापौर आणि ठाणे लोकसभा मतदारसंघाचे विद्यमान, नवनिर्वाचित खासदार नरेश म्हस्के यांनी, या समस्येकडे गांभीर्याने लक्ष दिले असल्याचे वृत्त, प्रसिद्धीमाध्यमांत प्रकाशित झाले होते. दरम्यान, या अनुषंगाने 'धर्मराज्य पक्षा'चे उपाध्यक्ष नितीन देशपांडे यांनी, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरव राव आणि ठाण्याचे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांना लिहिलेल्या पत्रातून, त्यांच्या निदर्शनास आणून दिले आहे की, ठाणे शहरातील काही जागृत नागरिकांनी, वर्ष-१९९७ मध्ये मासुंदा तलावाला पडलेल्या समाजकंटकांच्या विळख्याबाबत, ठाणे सत्र न्यायालयात खटला दाखल केला होता.** सदर खटला ठाण्यातील सुप्रसिद्ध वकील प्रशांत पंचाक्षरी यांनी लढला होता. त्यावर, दि. १९/१२/१९९८ रोजी, न्या. व्ही. डी. देशमुख यांनी, मासुंदा तलावाभोवती सहा महिन्यांच्या आत, कायमस्वरुपी सुरक्षा-रक्षक नेमण्यात यावेत, याबाबतचा आदेश ठाणे महानगरपालिका प्रशासनाला दिला होता. तसा ठरावदेखील ठाणे महापालिकेच्या तत्कालीन महासभेत संमत करण्यात आला होता; मात्र, न्यायालयीन आदेशाकडे महापालिका प्रशासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष झाल्याने, त्यानंतर त्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याबाबत, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त आणि ठाणे पोलीस आयुक्तांचे लक्ष वेधण्यात आले आहे.



दरम्यान, ठाणे महापालिका आयुक्त आणि पोलीस आयुक्तांना लिहिलेल्या पत्रात नितीन देशपांडे यांनी पुढे म्हटले आहे की, गेल्या काही वर्षांत ठाणे शहराचे नागरिकीकरण प्रचंड वाढल्यामुळे, ठाणे मोठ्याप्रमाणात फोफावले. परिणामी, ठाण्यात झपाट्याने विकासकामे सुरु झाली, जी अद्यापही सुरुच आहेत. यामुळे आपसूकच सोयी-सुविधांच्या बाबतीत प्रशासनावर ताण पडून, मूळ ठाणे शहरातील महत्त्वाच्या बाबींकडे ठाणे महानगरपालिकेचे दुर्लक्ष झाले. **विशेष म्हणजे, याच काळात नरेश म्हस्के हे, ठाणे महानगरपालिकेत नगरसेवक, सभागृह नेते, महापौर इत्यादी पदे अनेक वर्षे भूषवित असताना, त्यावेळी त्यांना याची जाणीव झाली नाही आणि आता ठाण्याचे खासदार झाल्यानंतर, त्यांना अचानक मासुंदा तलावाच्या सुरक्षिततेबाबत उपरती व्हावी, याचेच आम्हाला आश्चर्य वाटत आहे. मात्र, तरीदेखील सुमारे २६ वर्षांपूर्वी (वर्ष-१९९८) ठाणे सत्र न्यायालयाने दिलेल्या आदेशाची दखल, ठाणे महानगरपालिका प्रशासन आतातरी नक्की घेईल, याची आम्हाला पूर्णपणे खात्री असल्याचे नितीन देशपांडे यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे.** दरम्यान, शेजारच्या तरण तलावातील पाणी, मासुंदा तलावात सोडले जात असल्याने ते दुषित तर होतेच, त्याचबरोबर जेल तलावाच्या शेजारील पाण्याच्या टाकीतील पाणीदेखील, त्याच तलावात सोडले जाते. शिवाय घोसाळे तलावाच्या काठावर काही अर्धनग्न अवस्थेतील नागरिक झोपलेले असतात. याचाच अर्थ, फक्त मासुंदा तलावच नव्हे; तर, ठाणे शहरातील इतरही तलावं धोकादायक अवस्थेत आहेत. मासुंदा तलावाची गर्दुल्ल्यांपासून सुटका होणे हे गरजेचे आहेच; पण, त्याचसोबत तलावाची जैवविविधता जपण्यासाठीदेखील, ठाणे महानगरपालिका प्रशासनाने तातडीने पाऊले उचलावीत, जेणेकरुन ठाणे लोकसभा मतदारसंघाचे विद्यमान, नवनिर्वाचित खासदार नरेश म्हस्के यांना, या समस्येसंदर्भात भविष्यात कोणताही त्रास होणार नाही आणि त्यांचा मौल्यवान वेळही वाचेल, याची सर्वोतोपरी काळजी ठाणे महापालिका घेईल याची आम्ही अपेक्षा बाळगतो, असा उपरोधिक टोला लगावताना, नितीन देशपांडे यांनी, मासुंदा तलावाभोवती कायमस्वरुपी सुरक्षा-रक्षक नेमण्यासंदर्भातील, ठाणे सत्र न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी न झाल्यास, आम्हाला नाईलाजास्तव ठाणे महापालिका प्रशासनाविरोधात 'आव्हान याचिका' दाखल करावी लागेल, असा गंभीर इशारा पत्राच्या शेवटी दिला आहे.



*तत्कालीन अमेरिकन अध्यक्ष फ्रँकलिन रुझवेल्ट यांनी, जागतिक-महामंदीनंतरच्या एकूण गंभीर परिस्थितीचा आढावा घेऊन, सगळ्याच अमेरिकन भांडवलदारवर्गाची एक बैठक घेतली. डाव्या-विचारसणीचा वाढता राजकीय-प्रभाव विचारात घेऊन, त्यांनी 'न्यू डील' नावाचा करसंरचनेत व अर्थव्यवस्थेच्या इतर प्रांतात आमूलाग्र बदल घडवण्याचा प्रस्ताव पुढ्यात ठेवला. त्यातून, अमेरिकन-सरकारकडून डाव्यांचा प्रभाव रोखण्यासाठी 'कल्याणकारी-राज्य संकल्पने'बरहुकूम (Welfare-State) पावलं टाकली जाण्याचे निर्देशही दिले. परिस्थिती एवढी गंभीर असूनही अमेरिकन भांडवलदारवर्गातल्या निम्म्याहून अधिक धुरिणांनी त्याला विरोध दर्शवला...पण, रुझवेल्ट यांनी सगळा भांडवली-विरोध मोडून काढून, त्यांना अभिप्रेत असलेल्या आर्थिक-सुधारणा धडाक्यात राबवायला सुरुवात केली.*

# प्रॉफिट आणि प्रॉफेट...या एकमेकाशी फटकून रहाणाऱ्या 'परस्परविरोधी' बाबी आहेत....

उष्माघातामुळे हाजयात्रेत झालेले, एक हजाराहून अधिक निष्पाप बळी... हा आहे, सौदी अरेबियाला 'जागतिक तापमानवाढी'तून बसलेला एक तडाखा आणि त्यातून नियतीने शिकवलेला धडा!

**जो इस्लाम, साधं व्याज आकारु देत नाही आणि अंगमेहनत (मनुष्यऊर्जा) व पशूऊर्जेच्या बळावर साधीसुधी, जीवनावश्यक गरजांवर भर देणारी (जिचं, 'कार्बन-फूटप्रिंट' नगण्य असतं व जी मुळातूनच 'निसर्ग-पर्यावरणस्नेही' असते) जीवनशैली शिकवतो... त्या इस्लामच्या शिकवणुकीच्या विरोधात जाऊन, खनिज तेलाच्या व्यवसाय-बरकतीतून ओंगळवाण्या श्रीमंतीचा 'धनी' झालेल्या सौदी अरेबियासारख्या; तसेच, भारतासकट, जगभरातल्या सर्वच 'कार्बनकेंद्री भांडवली-व्यवस्थे'वर अर्थकारण चालवणाऱ्या देशांसाठी, हा एक 'WakeUp Call' आहे!**

खऱ्याअर्थाने, या जगात 'विकसित' म्हणावा, असा एकही देश अस्तित्वात नाही... सगळ्यांचीच वाटचाल अंति विनाशाकडे सुरु आहे; फक्त, मध्ये एक भौतिक प्रगती व संपन्नतेचा 'पडाव' आलाय एवढंच!

सौदी अरेबिया, हा लौकिक अर्थाने निरतिशय संपन्न देश; तर कोस्टा रिका, जॉर्डन, कोलंबिया हे तसे गरीब देश म्हणायचे. कोस्टा रिकामध्ये तर खनिज किंवा जीवाश्म इंधन (तेल, कोळसा, नैसर्गिकवायू), महत्त्वाची खनिजं व धातू सापडत नाहीत, ज्यामुळे सर्वसाधारणपणे भांडवली-संरचनेत श्रीमंती येते. खरंतर, त्यादृष्टीने पहाता 'भांडवली-परिभाषे'त कोस्टा रिका हा देश, दुर्दैवीच म्हटला पाहिजे...पण, वस्तुस्थिती ही आहे की, वरील सर्वाच्या अभावामुळेच तो देश खूप सुदैवी व आनंदी देश बनलाय. तिथली वीज ही, खनिज पदार्थ जाळून नव्हे; तर, नैसर्गिक-स्त्रोतांचा कल्पक वापर करुन 'कार्बन-फूटप्रिंट' कमीतकमी राखून बनते. लोक एकोप्याने व कमीतकमी गरजांवर आधारलेल्या 'निसर्ग-पर्यावरणस्नेही जीवनशैली'द्वारे



आनंदाने जगतात. याउलट नॉर्वे, स्वीडनसारखे तथाकथित अतिप्रगत देश...आपल्या भौतिक-संरचनेचा परमोच्च बिंदू गाठल्यानंतर, एखाद्या परजिवी बांडगुळासारखे इतर देशांच्या नैसर्गिक-संसाधनांचं अपरिमित शोषण करतच, आपला GDP टिकवून धरतायत... GDPचा, अर्थाअर्थी 'मानवी-कल्याणा'शी संबंध उरलेला नसून; तो 'मानवी-शोषणा'चा निर्देशांक बनलाय!

जेवढा GDP मोठा, तेवढं निसर्ग आणि माणसाचं शोषण मोठं....

**सौदी अरेबियासारखे कट्टर इस्लामपंथी देश, इस्लामचा धर्मग्रंथ, 'कुराणा'ला अनुसरुन फक्त, 'दारुबंदी' करुन धन्यता मानतात आणि तिथेच थांबतात...प्रत्यक्षात सौदी, अमाप खनिज तेल खोदून काढून व ते जाळून, हवेत कार्बन तर सोडतोच; पण, भारतासह इतर देशांसाठी तेलाचा प्रमुख निर्यातदार बनून, आपल्या तेलाच्या पैशातून आलेल्या श्रीमंतीच्या 'बुरख्या'आडून जगभरात अब्जावधी बॅरल तेलाची; म्हणजेच, पर्यायाने पर्यावरण-विनाशक 'कार्बन-ऊत्सर्जना'ची निर्यात करतो...आणि, हे करताना त्याला आपण 'कुराणा'च्या शिकवणुकीच्या विरोधात जाऊनच, आपल्या देशाची अर्थव्यवस्था चालवतोय, याचं भान ठेवावंस मात्र, वाटत नाही!**

...याचं कारण, सौदी अरेबिया हा, अमेरिकेच्या नादाने एक 'भांडवलशाहीप्रधान' देश बनलाय...तेथील राजेशाही, वेशभूषा, खाणंपिणं भले इस्लामशी वरकरणी तादात्म्य राखून असेल; पण, आतून 'भांडवलशाही' किंवा 'भांडवली-व्यवस्था' रटरटा उकळतेय! **भांडवलशाही, ही माणसातल्या पशूतुल्य वासनांना व संवेदनशून्यतेला बेफाम मोकाट सोडणारी आणि त्यावर कुणाचंही धड पूर्णपणे नियंत्रण नसणारी; तसेच, जगभरातल्या, वरपासून खालपर्यंत, सगळ्याच जनतेला आपलं आत्मघातकी व अनिवार 'व्यसन' जडवणारी अशी... एक सर्वव्यापक 'स्वयंचलित' यंत्रणा-मंत्रणा असल्याने, ती मानवासह एकूणच सजीवसृष्टीच्या अस्तित्वासाठी कितीतरी अधिक धोकादायक आहे! जागतिक-तापमानवाढीच्या महासंकटातसुद्धा अजूनही लोकांना, आपापल्या धर्मश्रद्धांना प्राणापलिकडे कवटाळून बसावसं वाटणं, हे माणसांमधली संवेदनाचं नव्हे; तर, 'शहाणपण'ही संपुष्टात येत चालल्याचं दुर्दैवी लक्षण नाही, तर दुसरं काय आहे?** निदान, सजीवसृष्टीसह मानवी-अस्तित्वच धोक्यात आणलेल्या, 'जागतिक-तापमानवाढी'च्या (म्हणजेच, पर्यायाने 'हवामान-बदला'च्या) महासंकटाच्या भीषण पार्श्वभूमीवर तरी, निसर्ग हीच 'जात' आणि पर्यावरण हाच, अखिल मानवजातीचा 'धर्म' बनला पाहीजे आणि त्याला अनुरुपच, जनसंख्या-जीवनशैली व अर्थव्यवस्थेचं प्रारुप आखलं गेलं पाहिजे... यापेक्षा परमात्म्याकडे, अल्लाहकडे व आकाशातल्या बापाकडे अजून काय वेगळं मागणं मागायचं...???

*...राजन राजे*

## भक्तांसाठी प्रेमळ सूचना -

१) इथून पुढे ''मोदी सरकार, मोदी सरकार'' असे म्हणायचे नाही ''एनडीए सरकार, एनडीए सरकार'' असं म्हणायचं! दोन्ही बाबू रागावले तर अवघड होईल सगळं!

२) वेगवेगळ्या खात्याच्या मंत्र्यांची आणि त्यांच्या पक्षांची नावे लक्षात ठेवायची सवय राहू द्या म्हणजे आधीसारखं मोदी म्हणतील तो कायदा आणि निर्णय वगैरे होणार नाही आता!

३) ''मनकी बात'' वगैरे तुम्हाला आवडत असेल, तर ती इथून पुढे जवळपास बंद पडेल. आता मोदीजींना बाता करायला भरपूर मित्रपक्ष आहेत. तेव्हा तुमच्याशी कमी बोलतील ते!

४) वंदे भारत ट्रेन, रस्ते, बोगदे वगैरेची उद्घाटने करताना एकटे मोदी चालले आहेत, असे दृश्य आता दुर्मिळ होत होईल. त्यांच्यासोबत, इतरही लोक दिसायला लागतील.. त्यांची सवय करुन घ्या!

५) मोदीजींनी दिवसातून चारदा कपडे बदलणे, फोटो काढून घेणे, मोरांना दाणे भरवणे, बिनकामाची भाषणे ठोकणे; यात दिवसाचे १८ तास वाया घालवणे आता बंद होईल आता त्यांना खरोखर १०-१२ तास काम करावे लागेल. त्यामुळे, वायफळ उद्योग दिसले नाहीत तर, नाराज होऊ नका!

६) परदेशात दौरे काढून रिकामटेकड्या एनआरआय लोकांना गोळा करुन ''मोदी मोदी'' वगैरे घोषणा द्यायला लावण्याचे कार्यक्रम बंद होतील...ही करमणूक कमी झाल्याने हिरमुसून जाऊ नका!

७) ''मी भक्त आहे तरी'' किंवा ''मी भक्त नाही तरी'' ही स्वतःला भक्त सिद्ध करणारी, दोन्ही वाक्ये चारचौघात बोलू नका. सध्या दिवस चांगले नाहीयेत!

८) शेतकरी, कष्टकरी, दलित, आदिवासी आणि अल्पसंख्यांक यांना वाईट बोलण्याचा मोह आता आवरा किमान विमानाने प्रवास करणाऱ्या लोकांनी तरी याबाबत काळजी घ्या!

९) या देशात धर्मनिरपेक्ष लोकशाही आणि संविधान अजून जिवंत आहे, हे समजून घ्या जिथे मोदीजींना दहा वर्षांनी का होईना; पण, विनम्रपणे झुकावे लागले तिथे, तुम्हालाही झुकावे लागेल, हे मनी ठेवा!

१०) शक्य तितक्या लवकर द्वेष आणि भक्ति सोडून माणसात या हा देश आणि इथले लोक खूप चांगले आहेत... तुम्हीही चांगले व्हा!

*– डॉ. विनय काटे*

# या पृथ्वीवर 'भांडवली-व्यवस्थे'तील माणसाइतका क्रूर जीव, दुसरा कुठलाही असूच शकत नाही...क्रूरता-निर्दयता, तुझं नाव, दोन पायांचा 'मनुष्यप्राणी'!

'गोमाता' तोंडाने जपत रहायचं आणि तिचे खाटीकखाने चालवणाऱ्यांकडून निवडणुकीसाठी 'चंदा' गोळा करायचा धंदा थाटायचा... 'गोमाता' म्हणत राजकारण करत रहायचं आणि तिला, तिच्या वासरापासून व वासराला, अधिकचा पैसा कमावण्यासाठी, तिच्या स्तन्यापासून क्रूरपणे तोडायचं (Invention of New Spike-Device)...घोर कलियुग, अजून दुसरं काय असतं?

**ओशो, नेहमी म्हणायचे, ''माणूस हा गाईचा आत्मा आणि माकडाचं शरीर, या संयोगातून उत्क्रांत होत घडलेला जीव आहे!''...गाईची महत्तता व तिला पाळणाऱ्या माणसांशी तिचं असलेलं 'तादात्म्य' वर्णन करताना, ते नेहमी उदाहरण द्यायचे की, ''आपल्या धन्याच्या कुटुंबातलं कुणीही दगावलं की, गोठ्यात बांधलेल्या गाईच्या डोळ्यातून आपसूक झरझर अश्रू वाहू लागतात!''**

...इथे फक्त, फरक इतकाच की, त्या गाईऐवजी, गाईच्या वासराच्या डोळ्याला धारा लागल्यात; पण, त्याच्या दुःखामुळे कुणा माणसाच्या डोळ्यात अश्रूचे दोनचार थेंब सोडाच; संवेदनेचा साधा अंशही कधि निर्माण होणे नाही!



विकृत 'भांडवली-बुद्धिमत्ता', कशी स्वतःसाठी क्रौर्यपूर्ण भौतिक समृद्धी-सुकाळ साधत जाते; पण, नैतिक-आंतरिक भूतदया व माणुसकीचा कसा दुष्काळ पैदा करत जाते...याचं, हे प्रत्ययकारी उदाहरण!

भांडवली-व्यवस्थेतला उच्चशिक्षित 'मध्यमवर्ग' प्रचंड मेहनतीने 'कॉर्पोरेटीय-करियरिस्ट' होतो, अनेक इतर क्षेत्रं गाजवण्यासाठी जीवाचं रान करतो; पण, समष्टीवर मनापासून प्रेम करणं, सर्व सजीवमात्रांमध्ये परमात्म्याचा अंश पहाणं... गोष्ट सोपी असली; तरी, काहीकेल्या त्याच्याकडून होत नाही आणि जग, भांडवली-बाजारपेठेतील अमानुष स्पर्धेपोटी अधिकाधिक संवेदनशून्य व अनैतिक बनत जातं!

त्याची अंततः परिणती म्हणून, पर्यावरणीय महासंकटातून उद्भवणाऱ्या विनाशाला-उत्पाताला, प्रामुख्याने 'भांडवली-व्यवस्थे'तला मध्यमवर्ग जबाबदार असेल; ते त्यांचंच महापातक असेल!

***...राजन राजे***

## राजन राजे यांच्या नेतृत्त्वाखाली औद्योगिकविश्वात आणखी एक मोठा चमत्कार... ...पान क्र. १ वरुन

बोटावर मोजता येणाऱ्या कंत्राटी-कामगारांनादेखील (पूर्वीच्या करारांच्या माध्यमातून, याच कंपनीतील जवळपास १५० 'कंत्राटी-कामगार' आजवर कायम केले गेले आहेत, हे विशेषत्वाने नमूद करतो आहोत), या कराराच्या कालावधीत 'कायमस्वरुपी' नोकरीत सन्मानाने प्रविष्ट करुन घेतले आहे!

**मंगळवार, दि. ११ जून-२०२४ रोजी, रबाळे एमआयडीसीमधील आस्थापनेत मोठ्या जल्लोषात आणि हर्षोल्हासाच्या वातावरणात संपन्न झालेल्या या ऐतिहासिक पगारवाढीत कंपनीतील एकूण २४२ कामगारांना व भविष्यात कंपनी-सेवेत 'कायम' होऊ शकणाऱ्या, अशा सगळ्याच कामगारांना, पहिल्या वर्षी ५,८०० रुपये, दुसऱ्या वर्षी ४,३५० रुपये तर, तिसऱ्या वर्षी ४,३५० रुपये पगारवाढ देण्यात आली असून, बेसिकमध्ये ६० टक्के व इतर अलाऊन्सेसमध्ये ४० टक्क्यांची वाढ करण्यात आली आहे.**

उल्लेखनीय बाब अशी की, दिवाळी-बोनस म्हणून, कमीतकमी ८० हजार व जास्तीतजास्त १ लाखाहून अधिक रुपयांची भरघोस रक्कम कामगारांना मिळणार आहे.

अशा प्रकारचा चमत्कार, कुठलंही भक्कम राजकीय-पाठबळ सोबत नसतानाही, ''राजन राजे'' नावाच्या, असंख्य कामगारांचं आर्थिक-उन्नयन करणाऱ्या, 'पंचाक्षरी-मंत्रा'ने केला आहे आणि तोच ते करु जाणे!

मरगळलेल्या औद्योगिकविश्वात सनसनाटी निर्माण करणारा, आणखी एक करार म्हणून, हा करार खचितच ओळखला जाणार आहे. या ऐतिहासिक कराराच्या माध्यमातून, 'हिवा'च्या कामगारांना सर्व्हिस अवॉर्ड म्हणून, पाच वर्षांसाठी ५००० रुपये, दहा वर्षांसाठी १०,००० रुपये, पंधरा वर्षांसाठी १५,००० रुपये, वीस वर्षांसाठी २०,००० रुपये, पंचवीस वर्षांसाठी २५,००० रुपये; तसेच, पुढे एखादा कामगार २६व्या वर्षी सेवानिवृत्त होत असेल तर, त्याला २६ हजार रुपये, २७व्या वर्षी सेवानिवृत्त होणार असेल तर, २७ हजार रुपये आणि कामगार जर २७ व ३०च्या दरम्यान सेवानिवृत्त होणार असेल तर, त्या कामगाराला ३० हजारांची रक्कम देण्यात येणार असल्याचे, या करारात नमूद करण्यात आले आहे.

याव्यतिरिक्त इतर, अनेक सेवासुविधा व सेवाभत्त्यांमधेही, कराराअंतर्गत भरघोस वाढ करण्यात आलेली आल्यानं, सध्याच्या पावसाळी वातावरणात, पहिल्यावहिल्या पावसाच्या आगमनाने थुईथुई नाचणाऱ्या मोरासारखं, समस्त हिवा-कंपनी कामगारवर्गाचं मन आनंदानं थुईथुई नाचू लागलंय!

दरम्यान, या ऐतिहासिक अशा त्रैवार्षिक करारामुळे, प्रामुख्याने भूमिपुत्र असलेल्या कामगारांच्या आयुष्यात 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चा कोंबडा खणखणीत स्वरात आरवल्यामुळे, आर्थिक समृद्धीची पहाट झालेली आहे. त्यामुळेच, ''केवळ एका पिढीचंच नव्हे; तर, कामगारांच्या तमाम पुढील पिढ्यापिढ्यांचंही कल्याण साधणारा नेता'', या राजन राजे यांच्या क्रांतिकारी लौकिकावर पुनश्च नव्याने शिक्कामोर्तब झालेलं आहे.

**''एका कायम कामगाराच्या जागी, तीन कंत्राटी-कामगार नेमण्याचे'' कामगारघातकी 'ट्रिपल-इंजिन' सरकारचे धोरण असताना व संपूर्ण भारतात कामगारविरोधी धोरणांचे चक्रीवादळ गरगरत असतानाच, प्रवाहाच्या विरोधात पोहून जाण्याची किमया, पोलादी कामगार-एकजुटीच्या बळावर, राजन राजे आणि त्यांच्या अध्यक्षतेखालील 'धर्मराज्य पक्ष' व त्याअंतर्गत असलेल्या 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ' नावाच्या कामगार संघटनेने, करुन दाखवलेली आहे. काळी कामगार संहिता लादून, कायम-कुशल कामगारांना अक्षरशः 'गुलाम' बनविण्याचे विश्वासघातकी-घृणास्पद उद्योग सुरु असताना, राजन राजे यांच्या नेतृत्त्वाखाली संपन्न झालेला, हा ऐतिहासिक करार होय!**

**कराराप्रसंगी समस्त हिवा-कामगारांना संबोधित करताना राजन राजे म्हणाले की, ''कामगारांसाठी 'अमृत' नव्हे; तर, 'विषाक्त किंवा विषा'समान ठरलेल्या, या 'स्वातंत्र्याच्या अमृतकाळा'त...म्हणजेच, देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे होऊन गेल्यावर व पुढील वर्षी देश प्रजासत्ताक झाल्याला ७५ वर्ष पूर्ण होत असतानाच...माझा, हिवा-कंपनीचा कामगार, या करारान्वये पगाराच्या सरासरीची 'पंचाहत्तरी' गाठत असावा (सरासरी पगार ७५ हजार) व स्वातंत्र्याचा 'शतकी-महोत्सव' साजरा होण्यापूर्वीच बोनसची 'शंभर-हजारी' (म्हणजेच, एक लाखाहून अधिक 'सहा आकडी' बोनस) मजल गाठावी...हा दुर्लभ असा, दुग्धशर्करा-योग आहे आणि तो केवळ, कामगारांच्या पोलादी एकजुटीने व संघर्षासाठी कुठल्याही त्यागाला तयार असण्याच्या दृढ निर्धारानेच घडून आला आहे... राजन राजे, हा कामगार-नेता, केवळ, निमित्तमात्र आहे!''**

यादरम्यान, या कराराप्रसंगी 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे उपाध्यक्ष श्री. रमाकांत नेवरेकर, महासचिव श्री. महेशसिंग ठाकूर, सचिव श्री. समीर चव्हाण यांच्यासह, 'हिवा इंडिया' युनिट अध्यक्ष श्री. निलेश बारोटे, उपाध्यक्ष श्री. संतोष गाडवे, सचिव श्री. संजय उघडे, उप-सचिव श्री. विजय सोनावणे, खजिनदार श्री. दादा मोरे, उप-खजिनदार श्री. गुरुनाथ पाटील, कार्यकारिणी सदस्य श्री. विनोद बावकर त्याचप्रमाणे व्यवस्थापनाच्या वतीने ऑपरेशन्स डायरेक्टर श्री. प्रशांत मानकामे, एच. आर., बिजनेस पार्टनर आणि डायरेक्टर श्री. हेमंत सुर्वे, सिनियर मॅनेजर, एच. आर. आणि इंडस्ट्रीयल रिलेशन्स श्री. संदेश मोडक, डेप्युटी मॅनेजर, एच. आर. श्री. संतोष आग्रे आदी मान्यवर मंडळी यावेळी उपस्थित होती.

# आपल्या देशात ‘अर्थक्रांति–संकल्पना’ राबविण्यासोबतच, जपान, द. कोरियासारख्या देशांप्रमाणेच कठोर ‘वारसाहक्क कर व भेट–बक्षीसांवर कर’ स्वतंत्रपणे लावावा लागेल...

‘जपान’सारख्या प्रगत व जगभर औद्योगिक–साम्राज्य उभं करणाऱ्या देशात देखील, तुलनेनं अब्जोपतींची (Blood Billionaires) संख्या मोठी नाही वा तिथे कुणी ‘दरिद्री नारायण’ही नाही ! मात्र, ज्यांनी ‘दरिद्री नारायण’ ही चपखल संज्ञा वापरली त्या, म. गांधींच्या किंवा ज्यांनी, समतेचा संदेश दिला त्या, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भारतासारख्या देशात मात्र, एका बाजुला ‘कंत्राटी–कामगार/कर्मचारी’ पध्दतीतले कारखान्यात राबणारे व रोजगार हमी योजनेअंतर्गत शेताच्या बांधावर राबणारे शेतमजूर नांवाचे ‘दरिद्री नारायण’ प्रचंड प्रमाणात तयार होत रहातात; तर, दुसऱ्या बाजुला ‘कर लो दुनिया मुठ्ठी में’वाल्या धनदांडग्या जैन–गुजू–मारवाड्यांच्या फौजाच्या फौजा बिनदिक्कत उभ्या रहात जातात व दिवसागणिक वाढत जातात.

साखर कारखान्यातून एका बाजुला गोड साखर आणि दुसऱ्या बाजुला दर्पयुक्त दुर्गंधी मळी बाहेर पडावी, अशी ही दोन परस्परविरोधी ‘समाजध्रुव’ निर्माण करणारी टोकाची विषम अर्थव्यवस्था आपल्या देशात मौजूद आहे. गेल्या २० वर्षांहून अधिक काळ जपानमध्ये आर्थिक–मंदी असूनही, भारताच्या तुलनेनं फारच कमी आर्थिक–विषमता असल्याचं चित्र आहे. तिथे बहुतांश ‘मध्यमवर्ग’च आहे. याचं प्रमुख कारण, तिथे वारसाहक्काबाबत (Inheritance Tax) व भेटवस्तूवरील (Gift Tax) कर–संरचना फारच कडक म्हणजे वस्तू वा मालमत्तेच्या किंमतीनुसार १० ते ५०% एवढे हे कर, चढे व मोठे आहेत. **साधारणत चौथ्या पिढीनंतर आपल्या पूर्वजांनी कमावलेल्या संपत्तीवरील वारसाहक्क, त्यामुळे जवळपास संपुष्टातच येतो. म्हणूनच तर, जपानमध्ये साधं घरगुती काम करणाऱ्या ‘कामवाल्या बाई’ला सुध्दा ऑफिसमध्ये काम करणाऱ्या सुशिक्षित महिलांच्या आसपासचा पगार आणि सवलती दिल्या जाऊ शकतात. मध्यंतरी, दक्षिण कोरियात अतिश्रीमंतांची संपत्ती वारसाहक्कानं पुढल्या पिढीकडे हस्तांतरित होताना, जवळपास निम्मा वाटा सरकारजमा होत असल्याने, ‘सॅमसंग’ या जगविख्यात कंपनीच्या ‘ली कून–ही’ या ७४ वर्षीय कॅन्सर आजारग्रस्त मालकापश्चात ‘ली’ कुटुंबियांवर ‘वारसाहक्क–कर’ भरण्यासाठी ‘सॅमसंग’चे शेअर्स विकण्याची वेळ आली होती.** ही जशी, ‘ली’ कुटुंबियांची सॅमसंग कंपनीवरील मालकी धोक्यात येण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली होती. हे आपल्याकडे कधि घडेल काय? .की, अंबानी, अदानी, टाटा, बिर्ला, मल्या, जिंदाल यासारख्या उद्योगपतींच्या घरात पाळणा हलला रे हलला की, जन्माला आलेलं बालक, कुठलही कर्तृत्त्व ‘न’ गाजवता व एकही पैसा वारसा–कररूपाने ‘न’ भरता, अब्जोपती बनतं आणि तिचं परंपरा पुढे चालू राहते. **जशी, बड्या राजकारण्यांच्या घरात पाळण्यातच ‘लोकनेता’ बनण्याची आपल्याकडे परंपरा आहे, त्यातलाच हा अश्लाघ्य प्रकार आहे! राजकीय आणि सामाजिक लोकशाही’’चं मंदिर, हे फक्त, ‘आर्थिक लोकशाही’च्या वा ‘आर्थिक समरसते’च्या पायावरच उभं राहू शकतं. अन्यथा नव्हे! आमच्या राज्यघटनेत ‘व्यक्तिस्वातंत्र्य, समता, बंधुता, समाजवाद’ यासारख्या शब्दांची भरमार असणं, केव्हाही चांगलचं आहे; पण, त्यात सर्वच भारतीय एकत्रितपणे, देशाच्या आर्थिक प्रगती व समृध्दीतील, ‘देशाचे नागरिक’ म्हणून हक्काचे वाटेकरी आहेत** (Common OR Shared Prosperity), **हा अत्यंत महत्त्वपूर्ण शब्दच कुठे नाही.** मग, तसा ‘अर्थविचार व अर्थव्यवहार’ कुठून असणार???. आजही, आमच्या कोकणात रानडुकराची शिकार कोणीही करो, शिकाऱ्याला थोडा मोठा वाटा देऊन, उरलेलं मांसमटण सर्वांना वाटून घेण्याची पध्दत आहे. हा ‘आदिम साम्यवाद’ योग्यच आहे; कारण, त्यात माणुसकीही आहे आणि व्यक्तिगत प्रतिभा–प्रयत्नांची जाणीव ठेवणं, त्याला यथोचित वाव देणं, असं दोन्ही आहे. ‘सब घोडा बारा टक्का’ असं कम्युनिस्टांसारखं अनैसर्गिक तत्त्व, अंति व्यक्ति व समाज मानस ‘कुंठीत’ करुन टाकतं. सरतेशेवटी, मनुष्यप्राणी, ही विधात्याची अनुपम अशी निर्मिती आहे; जी, केवळ ‘आहार, निद्रा, भय, मैथुन’, या चौकटीतच सर्वकाळ बंदिस्त नाही राहू शकत. त्याला आकाशाचे ‘वेध’ आणि ‘वेड’, हे लागणारच. पण फक्त, त्याला विवेकाचं कुंपण मात्र हवंच. एकटाकी समानता, निसर्गालाच मंजूर नाहीच. तरीही, सारख्याच लांबी–जाडीची नसली; तरी, हातापायाच्या बोटांच्या असं मात्र कधिही होत नाही की, एक बोट दोन इंच लांब तर दुसरं दोन फुट लांब. म्हणूनच, तर मूठ आवळली गेली की, सगळी बोटं.... एकसमान लांबीत प्रेमाने व शिस्तीने उभं राहल्याचा भास होतो. अशीच ‘अमनशांति’साठी माणुसकीची ‘वज्रमूठ’ उभी करायला हवी आणि त्यासाठीच अमानुष आर्थिक–विषमतेला ‘मूठमाती’ द्यायलाच हवी !




**द. कोरिया–जपानसारख्या पुढारलेल्या देशांप्रमाणे आपल्या देशात ‘वारसाहक्क करा’संदर्भात कठोर तरतूदी अंमलात आणून देशात निर्माण झालेली टोकाची विषमता नियंत्रणात आणली गेलीच पाहीजे म्हणूनच तर, जपान–कोरियामध्ये भारत–अमेरिकेसारखी टोकाची आर्थिक–विषमता बिलकूल आढळत नाही... हे एवढं, त्याकामी ध्यानात घेतलं तरी पुरेसं आहे!**

मित्रहो, सिक्युरिटी ट्रान्झॅक्शन् टॅक्स् (STT)च्या संदर्भात समाजहितैषी विचारवंत व TISS मध्ये अध्यापक असलेले सर्वश्री संजीव चांदोरकर, खालीलप्रमाणे आपली प्रगल्भ वैचारिक मांडणी करत असताना... ‘धर्मराज्य पक्षा’च्या व्यासपीठावरुन वरीलप्रमाणे आम्ही प्रदीर्घकाळ करीत असलेली सैध्दांतिक मांडणीदेखील, संजीव चांदोरकरी मांडणीची कास धरुनच समांतर वाटचाल करीत असल्याचे, सुजाण वाचकांच्या खचितच ध्यानी येईल!!!

*...राजन राजे* (अध्यक्ष: धर्मराज्य पक्ष)

---

आपल्या हतबल–हतबुद्ध जगण्याच्या बुडातला ‘अंगार’ आणि जगण्याच्या अगतिकतेच्या अंतरंगात दडपला गेलेला; पण, तरीही, उसळी मारुन बाहेर पडण्याची संधि शोधणारा ‘ज्वालामुखी’...अग्नी किंवा तेज, या पंचमहाभूताची दोन्ही रुपं, एकाचवेळी उरी जपणारी ‘लीना पांढरे’ नावाची ‘एक स्त्री’...‘कुलविंदर कौर’ नामक दुसऱ्या स्त्रिचं, दुर्गेसदृश रौद्र रुप पाहून, आतून मोकळीढाक होते आणि समाजमाध्यमातून प्रत्ययकारी ‘बोलकी’ होतेय!

...काही वर्षांपूर्वीच्या जागतिकस्तरावरील ‘Me Too’, या लैंगिक–अत्याचार पीडित, महिला–प्रस्फुटीकरणाच्या शृंखला–प्रक्रियेला चालना देणाऱ्या उद्रेकाची आठवण करुन देणाराच जणू, हा ऐतिहासिक प्रसंग...समस्त अन्याय–अत्याचार–शोषणग्रस्त महिलावर्गाला ‘‘एक ‘थप्पड’ तो तबियत से मारो’’, असं गर्जून सांगतोय....

मात्र, लीनाजींनी वर्णिलेला ‘अँग्री यंग मॅन’ अमिताभ बच्चन, फक्त पडद्यावरच सत्ताधाऱ्यांना–गुंडांना बडवत व्यवस्था–विद्रोह गाजवत असतो...प्रत्यक्ष व्यवहारात मात्र, सचिन तेंडुलकरला बगलेत मारुन, करोना–काळात, नरेंद्र मोदींच्या एका इशाऱ्यावर ‘टाळ्या आणि थाळ्या’ बडवत रहातो, हे आपलं व आपल्या देशाचं दुर्दैव आहे... तर, अमिताभसारखाच ‘लीनाजींनी न वर्णिलेला’; पण, ‘तनुश्री दत्ता’ व तत्सम इतर अभिनेत्रींच्या कथित लैंगिक–शोषणाबाबत अनंत अपराधी असणारा व व्यवस्थेला तसाही संपूर्ण शरणागत असणारा...पण, हिंदी चित्रपट–पडद्यावर मात्र, ‘अँग्री–विद्रोही स्टार’ असलेला एक ‘मुखवटेबाज’ मराठी–नट, फक्त ‘भूसा भरलेलं भोत’ असल्याचंही आपल्याला स्मरल्याखेरीज रहात नाही... हीच, लीनाजींच्या लेखणीची ताकद आहे!

*...राजन राजे*

# पर्यावरणाचा ऱ्हास आणि निसर्ग व मानवाचे अपरिमित शोषण 'पर्यावरण-संरक्षण व निसर्गस्नेही जीवनशैली'...

**हा विषय एवढा कमालीचा गुंतागुंतीचा, अतिशय गंभीर व अत्यंत धोकादायकरित्या संवेदनशील बनलेला आहे; तसेच, त्याची व्याप्ती एवढी महाप्रचंड आहे की, तो केवळ NGO-संस्कृतिच्या अजेंड्यावरील विषय बनून राहू शकत नाही किंवा ५-१० वर्षांच्या निवडणुकींच्या राजकारणापलीकडे पाहू 'न' शकणाऱ्या ऱ्हस्वदृष्टीच्या राजकारण्यांच्या हाती वा 'पोटार्थी' शास्त्रज्ञांच्या हाती, हा विषय सोपवून आपल्याला स्वस्थही बसता येणार नाही. ज्याप्रमाणे, धार्मिकता किंवा अध्यात्मिकता म्हणजे केवळ, पूजाअर्चा करणे नव्हे; त्याप्रमाणेच, 'पर्यावरण-संरक्षण' म्हणजे केवळ, वृक्षारोपण करणे वा पक्षांसाठी घरटी बांधणे नव्हे ..ती तर त्यादृष्टीने फक्त एक सुरुवात झाली!** पर्यावरणीय ऱ्हासाची बीजं रोवलेली आहेत; त्या व्यवस्थेच्या आसाला भिडण्याचं आव्हान आपल्याला स्वीकारावं लागेल. १८व्या शतकात सुरु झालेली व अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे; तसेच, व्यवस्थापकीय कार्यकौशल्यामुळे निरंतर बेफाम घोडदौड करत रासायनिक/आण्विक-प्रदूषण व 'कार्बन-उत्सर्जन' करीत सुटलेली जीवनशैली आणि लोकसंख्येचा झालेला विस्फोट. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून, मानवजातीच्या पुढील पिढ्यांच्या व अवघ्या सजीवसृष्टीच्या अस्तित्वाच्या संदर्भातील हा गहनगंभीर प्रश्न बनल्यानं, तो देशात-विदेशात, एक प्रमुख राजकीय मुद्दा व्हायलाच हवा. मात्र, सांप्रतकाळी आपल्या देशात 'विकास' नावाच्या एक प्रकारच्या तीन अक्षरी 'जारणमारण' मंत्रतंत्रानं एवढा धुमाकूळ घातलाय की, निसर्गाला वेडीवाकडी ओरबाडणारी व पृथ्वीला 'माता' न मानता 'भोगदासी' मानणारी ही हपापलेली पाश्चात्यसंस्कृति (हपापा-संस्कृति) येत्या काही दशकातच आपल्यासकट, नाम शेष झालेली हडप्पा-संस्कृति बनू शकेल, इतपत परिस्थिति धोकादायक बनलेली आहे!

**'पर्यावरण-संरक्षणा'चा कडवा आग्रह हा, लौकिकदृष्ट्या राजकारणात हाराकिरी पत्करायला लावणारा असू शकतो व तो तसा आहे, हे अनेकवार सिद्धही झालेलं आहे. या लोकसभा निवडणुकीतल्या 'धर्मराज्य पक्षा'च्या दारुण पराभवानं वेगळं काय सांगितलं? असं असलं तरीही, श्रीकृष्णाच्या व शिवछत्रपतींच्या राजनितीवर व तत्त्व-ज्ञानावर ठामपणे उभ्या असलेल्या 'धर्मराज्य पक्षा'ने, त्या राजनितीला-तत्त्वज्ञानाला अनुसरूनच, पर्यावरणीय संकटांच्या रूपाने उभी ठाकलेली, ही काळाची विनाशकारी पावलं वेळीच ओळखून, हे शिवधनुष्य पेलायचं केव्हाच ठरवलंय.** आमचं पर्यावरणीय क्षेत्रातील काम हे प्रामुख्याने, त्या पुढील पिढ्यांच्या हितासाठी आहे, ज्यातील सध्या निव्वळ स्वतःचं अस्तित्व टिकवण्यासाठी केविलवाणी धडपड करणारे, पशु-पक्षी-जलचर-वनस्पती आम्हाला मतं देऊ शकत नाहीत! तेव्हा, मतं मिळविण्यापेक्षाही, योग्य दिशेनं मनं वळवणं महत्त्वाचं!! .त्यासाठी, पडेल तो त्याग करायची तयारी हवी. लोकापवाद स्विकारायची, सतत अपमान रिचवण्याचीही तयारी हवी. ते 'सतीचं वाण' 'धर्मराज्य पक्षा'नं जन्मतः स्विकारलंय! कर्मण्ये वाधिकारस्ते मा फलेषु कदाचन या कळीकाळाला पुरून उडणाऱ्या श्रीकृष्णाच्या उपदेशाला स्मरून काम करणारी आम्ही 'धर्मराज्य पक्षा'ची मंडळी असल्यानं, फळाची आम्हाला अपेक्षा नाही, चिंता तर त्याहूनही नाही!

राजकीयदृष्ट्या 'पर्यावरण-संरक्षण' हा अवघड वळणावरचा प्रवास असला तरीही, त्यादृष्टीने सातत्याने व निर्धाराने राजकीय-जागृति निर्माण करून 'प्रथमतः मनं वळवणं व यथावकाश मतं मिळवणं' आणि त्याद्वारे, सत्तेचा सोपान चढून सुखीसमाधानी अशी चिरस्थायी वा शाश्वत जीवनशैली उभारण्याच्या दृष्टीनंच राजकारण, अर्थकारण व विकासाचं प्रारूप या देशात, या महाराष्ट्रात उभं करणं, हे, आम्हाला अपेक्षित आहे! फक्त, ईशचरणी एवढीच प्रार्थना आहे.. एवढीच तळमळ आहे की, सावरण्याची वेळ मनुष्यजातीच्या हातून निसटून जाईल, इतका उशीर (Point Of No Return) त्यास लागू नये!!!



**..मित्रहो पाश्चात्यसंस्कृतिच्या, यापुढे अधिक आहारी न जाता, असा सांस्कृतिक व आध्यात्मिक प्राचीन वारसा लाभलेल्या भारतानं 'पर्यावरण-संरक्षणाच्या व त्या अनुषंगाने 'शाश्वत-जीवनशैली' उभारण्याच्या कामी जगाचं नेतृत्व करावे.. आणि, महाराष्ट्रातील मराठमोळ्या 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे' म्हणणाऱ्या, निसर्गस्नेही मराठी-संस्कृतिनं या कामी भारताचं नेतृत्व करावं..**

त्यासाठी, महाराष्ट्र स्वायत्त व्हावा.. अगदी, काश्मीरच्या ३७० कलमाअंतर्गत असलेल्या, नोकरी-धंदा कारण्याबाबतीतील वा जमीनजुमला खरेदी करण्याबाबतीतील कडक तरतुदी, महाराष्ट्रासह सर्व राज्यांना लागू व्हाव्यात!!!

भांडवली व्यवस्थेनं सभ्यतेच्या व संस्कृतिच्या सर्व मर्यादा सोडून, देशभर चालवलेला मानवी शोषणाचा, संतापजनक व विकृत धुमाकूळ..

प्रख्यात साहित्यिका व विदुषी कै. दुर्गाताई भागवत एकदा म्हणाल्या होत्या की, आम्ही राहायचो त्या मुंबईच्या फोरास रोड भागात, 'गिल्डर-लेन' या, एका छोट्याश्या लांबीरुंदीच्या रस्त्यानं त्याच्या, दोन्ही बाजूंकडील स्त्रियांच्या जीवनात केवढ्या मोठ्या तफावतीची भिंत उभी केली होती. पलीकडे देहविक्रय करणाऱ्या दुर्दैवी स्त्रियांची 'बस्ती' होती; तर, अलिकडच्या बाजूला आम्हा घरंदाज म्हणून गणल्या जाणाऱ्या स्त्रियांची 'वस्ती' होती!

**..तशीच अमानुष तफावत, १९९० च्या आसपासच्या अगदी छोट्याश्या कालखंडानं 'कामगार-कर्मचारी' विश्वात केली आणि पाहता पाहता लढाऊ कामगार-चळवळ शब्दशः पत्त्याच्या बंगल्यासारखी कोसळून पडली उरलीसुरली कणाहीन कामगार चळवळ, जणू गांडुळांची 'वळवळ' आणि 'कामगार पुढारी' नावाच्या 'पेंढाऱ्यां'ची 'फळफळ' झाली!!! अवघ्या काम गार-कर्मचारी विश्वात, कायम व कंत्राटी अशी उभी फूट निर्माण करून. उद्योगपती-राजकारणी-नोकरदार या 'भांडवली' व्यवस्थेनं, आपापसात गुन्हेगारी 'मांडवली' करून, 'कंत्राटी-कामगार/कर्मचारी' नावाच्या 'गुलाम व नव-अस्पृश्य' अशा, नवतरुणांच्या पलटणी 'औद्योगिक व सेवाक्षेत्रा'त जागोजागी उभ्या करायला घेतल्या.** 'कंत्राटी-कामगार' पुरविण्याची.. बिनभांडवली, बिनडोक व बिनधोक 'सोन्याची खाण', सर्वपक्षीय राजकीय नेत्यांच्या व राजकीय पदाधिकाऱ्यांच्या हाती लागल्यानं, भारतीय समाजातील 'जातिभेदा'नं कधि केला नसेल, असा 'दुभंग' समाजरचनेच्या 'पिरॅमिड'च्या तळाशी असणाऱ्या, करोडो कामगार-कर्मचाऱ्यांच्या जगण्याच्या संघर्षात, 'कंत्राटी-कामगार/कर्मचारी पद्धती'ने निर्माण केला. सर्वसामान्यांच्या जगण्याची पूर्ण 'कोंडी' केली. देशातल्या 'लोकसंख्येच्या विस्फोटा'नं, 'कंत्राटी-कामगार/कर्मचारी-पद्धती'च्या प्रसारासाठी अगदी फळफळणारी अशी सुपीक भूमी, या बदमाष भांडवली-व्यवस्थेला बहाल केली. त्याचीच परिणती म्हणून, आज देशात ही लुटारू व्यवस्था, मेक इन इंडिया'चे व 'इंडस्ट्रीयल कॉरिडॉर्स'चे नारे लावताना दिसत्येयं.. आपल्या देशाच्या पर्यावरणाचा विध्वंस करून, देशवासीयांचं रक्त आणि घाम, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय बाजारात अत्यंत स्वस्त दारात विकण्याचं, ते एक महाभयंकर षडयंत्र आहे, दुसरं काय? मित्रहो, कारण एकच. की, 'कंत्राटी-कामगार/कर्मचारी पद्धत' देशात जबरदस्तीने लादली गेलीय पण, तिचे अनेक भीषण परिणाम खालीलप्रमाणे आहेत, जे आजच्या तरुण पिढीला भोगावे लागतायंत आणि पुढच्या पिढ्यापिढ्यांना भोगावे लागतील. *...पृष्ठ क्र. ७ वर*

# मतदारांनी दिला चांगलाच 'दणका'



भक्तांच्या एका गटावर वाचलं. एक काका म्हणाले, बरं झालं, हे व्हायलाच पाहिजे होतं. मोदीजींना एकदा का होईना पण 'फटका' बसायलाच पाहिजे होता!

**राहूल गांधींच्या मतांची आकडेवारी फार दूरची गोष्ट झाली. गांधी घराण्याच्या जवळच्या किशोरीलाल शर्मांनीसुध्दा जेवढ्या मतांनी स्मृती इराणीना हरवलं त्यापेक्षाही कमी मतांनी यंदा ब्रॅण्ड मोदीजी जिंकलेत.**

**५०० वर्षाच्या अपमानाचा बदला घेतला म्हणत जिथे 'राम को वापस लाये है'चा जयघोष केला, त्याच अयोध्येत लाजीरवाणा पराभव पत्करावा लागला.**

२०१९ मधील ६२ जागांवरून आता ३३ जागा अशी भाजपची घसरगुंडी इनमीन पाचच वर्षात उत्तर प्रदेशात राहुल-अखिलेश या तरूणाईने करून दाखवली.

५०० कोटींची रसद पुरवून आणि शंभर कामांचा बागुलबुवा उभारून मुंबई खिशात घालायचा (आणि मग ती वेगळी करायचा) विडा उचललेल्या मोदीजींना मुंबईत फक्त एकच जागा मिळाली.

घाटकोपर होर्डींग दुर्घटनेतील मृतांचे रक्तही सुकले नव्हते तरी त्यांच्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करीत जिथे मोदीजींनी भव्यदिव्य रोड शो केला तिथला उमेदवार हरला.

प्रज्वलला मत म्हणजे, मोदींना मत असं म्हणत ज्या मास रेपिस्ट प्रज्वल रेवण्णासाठी मोदीजींनी मते मागितली तो ही हरला.

**महाराष्ट्रावरील ओझं आणि भटकती आत्मा असं म्हणत मोदी-शहा-ने ज्यांची जाहीर टिंगल, केली त्या शरद पवारांनी स्वत:चे दहापैकी आठ उमेदवार निवडून आणले, त्यातही डॉ. सुजय विखे, पंकजा मुंडे आणि रणजीत निंबाळकर या भाजपच्याच दिग्गजांना हरवून!**

आमदार पळवले, खोके सरकार बनवले, पक्ष फोडला, चिन्ह चोरले, जवळच्यांना तुरुंगात टाकले, सगळ्या यंत्रणा कामाला लावल्या, तरीही उध्दव ठाकरेंविषयी जनमत बदलू शकले नाहीत.

ज्या पक्षाला अगदी कस्पटासमान लेखले त्यांच्याच उमेदवारांनी डॉ. हिना गावीत, डॉ. सुभाष भामरे, नवनीत राणा, सुनील मेंढे, अशोक नेते, सुधीर मुनगंटीवार, प्रतापराव चिखलीकर, रावसाहेब दानवे, राम सातपुते, सुधाकर श्रृंगारे आणि ॲड. उज्वल निकम या भाजपच्याच दिग्गज उमेदवारांना सरळ लढतीत पराभूत केले, अगदी अपक्ष लढलेल्या काँग्रेसच्या विशाल पाटलांनीही भाजपच्या संजय पाटलांना धूळ चारली आणि काँग्रेस पक्ष यंदा महाराष्ट्रात सर्वाधिक निवडून आलेल्या खासदारांचा पक्ष ठरला.

**आणि भाजपला ३७० जागा आणि ४०० पार एनडीए होईल अशी मोदीजींनी गर्जना केली होती. त्याच भाजपला आता २४० आणि एनडीएला ३००चाही टप्पा पार करता आला नाही. वर सरकार बनवण्यापासून पाच वर्ष चालवण्यापर्यंत इतरांच्या नाकदुऱ्या काढाव्या लागणार ही नामुष्की वेगळीच!**

याला फटका म्हणत नाहीत; तर, मतदारांनी चांगलाच 'दणका' दिला असं म्हणतात!

***...आनंद भंडारे***, 'समाधान दिन', २०२४

---

# पाणीपुरवठा सुरळीत होईपर्यंत, दिल्लीतील महाराष्ट्र सदन तत्काळ कुलूपबंद करा !

## 'धर्मराज्य पक्षा'ची मुख्यमंत्र्यांकडे मागणी...



**ठाणे (प्रतिनिधी) :** दिल्लीतील पाणीटंचाईचा फटका नवीन महाराष्ट्र सदनालाही बसला असल्याचे वृत्त, प्रसिद्धीमाध्यमांत प्रकाशित झालेले असून, या बातम्यांच्या माध्यमातून असे कळते की, नवनियुक्त केंद्रीय मंत्र्यांच्या भेटीवेळी, बाहेरुन पाण्याच्या (मिनरल वॉटर) बाटल्या आणून, त्यांची व्यवस्था करण्याची वेळ व्यवस्थापनावर आल्याचे धक्कादायक आणि तितकेच संतापजनक वास्तव उघड झालेले आहे. दरम्यान, दिल्लीत भीषण पाणीटंचाई असताना, महाराष्ट्रातील नवनियुक्त केंद्रीय मंत्री, महाराष्ट्र सदनात वास्तव्यास असणे आणि त्यांच्यासाठी पाणी उपलब्ध नसतानादेखील, एका केंद्रीय मंत्र्याने चक्क फिल्टरच्या पाण्याने अंघोळ करणे, ही घटना म्हणजे निर्लज्जपणाचा कळस आहे. एकीकडे महाराष्ट्रातील दुर्गम खेड्यांत आणि आदिवासी पाड्यांत, पाण्याचे प्रचंड दुर्भिक्ष्य असल्यामुळे, अबालवृद्धांना पाच-पाच किलोमीटरवरुन पाणी आणावे लागत असताना, दुसरीकडे मात्र, महाराष्ट्र सदनात भीषण पाणीटंचाई असताना, नवनियुक्त केंद्रीय मंत्री नीलाजारे-पणाने चक्क मिनरल वॉटरने अंघोळ करतात, यालाच असंवेदनशीलता म्हणतात. याबाबत 'धर्मराज्य पक्षा'च्या भावना अतिशय तीव्र असून, जोपर्यंत दिल्लीतील महाराष्ट्र सदनातील पाणीपुरवठा सुरळीत होत नाही, तोपर्यंत महाराष्ट्र सदन कुलूपबंद करण्यात यावे आणि यासंदर्भात तातडीने कार्यवाही करीत, आपली संवेदनशीलता प्रकट करावी, अशी आग्रही मागणी 'धर्मराज्य पक्षा'चे उपाध्यक्ष नितीन देशपांडे यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

---

## पर्यावरणाचा ऱ्हास आणि निसर्ग व मानवाचे अपरिमित शोषण... *...पृष्ठ क्र. ६ वरुन*

१) सर्व कामगार-कर्मचाऱ्यांना, सर्वत्र अत्यंत तुटपुंज वेतनमान/बोनस (ज्यात जेमतेम 'तगता' येईल; सन्मानानं 'जगता' मात्र येणं केवळ अशक्य)

२) 'बेकार-भत्त्या'च्याही लायकीचं नसलेलं, अतिशय फालतू व सर्व श्रमिकांची क्रूर थट्टा करणारं किमान-वेतन.

३) नोकरीमध्ये टोकाची असुरक्षितता व अवमानकारक सेवाशर्ती.

४) कुटुंबातील एका सदस्याच्या पगारमानात घर चालणं सर्वथैव अशक्य असल्यानं व कुठल्याही नोकरीत बिलकुल सुरक्षितता उरली नसल्यानं, पती-पत्नी दोघांनाही निव्वळ आर्थिक विवंचनेपोटी, उरापोटावर (अपत्यांचं भरणपोषण व वाढीकडे व इतर कुटुंबिय-सदस्यांकडे पुरेसा वेळ न देता) मिळेल ती नोकरी वा कसलातरी व्यवसाय (पोळीभाजी करणं किंवा इतर हलकीसलकी कामं) करत राहायला लागणं.

५) अमानुष स्वरूपाची 'आर्थिक-विषमता'.. कंपन्यांच्या प्रमुख अधिकाऱ्यांना, तळाच्या काम गार-कर्मचाऱ्यांच्या तुलनेत, शेकडोंचं नव्हे; तर, हजारो पटीने पगारमान व सोयीसवलती जास्त असतात.. जेव्हा, विदेशात हीच तफावत बारा ते वीस पटीपेक्षा जास्त असू नये (तिथे सरासरी चाळीस ते पन्नास पटीत असते), यासाठी जनमताचा मोठा रेटा उभा राहताना दिसतोय.

६) करोडो आत्म्यांचा आक्रोश व खदखदण-ारा आर्थिक व सामाजिक असंतोष (ज्याच्या भविष्यातील भूकंपाची विस्फोटक शक्ती, कुठल्याही 'रिश्टल-स्केल'वर मोजता येऊ शकणार नाही.)

७) देशाचं भविष्य असणाऱ्या तरुणपिढीत वैफल्यग्रस्ततेमुळे वाढीस लागलेली व्यसनाधिनता, बेदरकारी व गुन्हेगारीवृत्ती.

पण, लक्षात कोण घेतो, मित्रांनो???

**..राजकारण्यांच्या व 'शेठजीं'च्या मालकीचा असलेला, संपूर्ण प्रिंट व इलेकट्रॉनिक मिडीया, याच 'कंत्राटी-कामगार/कर्मचारी प्रथे'चा बेकायदेशीर व माणुसकीशून्य अवलंब करून, पत्रकार व इतर कर्मचाऱ्यांना गुलाम गिरीनं राबवून चालत असल्यानं, त्यातून हा धुमसणारा 'करोडो आत्म्यांचा आक्रोश', लोकांपुढे कधी गांभीर्यानं मांडला जाईल, अशी अपेक्षा करणं म्हणजे, शुद्ध वेडगळपणाचं लक्षण ठरेल.. आणि म्हणूनच, देशातल्या या 'व्यवस्थे'चं हिडीस व निर्घृण शोषक स्वरूप (Vampire-State) उघडं पाडून जनजागृती करण्यासाठी.. ५ जून-२०२१ (शनिवार) या 'जागतिक पर्यावरण दिनी', त्यावरील 'धर्मराज्य पक्षा'तर्फे माझे थोडक्यात विवेचन ..**

**!! जय महाराष्ट्र. जय हिंद !!**

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# भाजप आणि संघाच्या केडर: एक विश्लेषण

प्रत्येक निवडणुकीचे निकाल लागले की, मुख्य माध्यमं असोत की, सोशल मिडिया असोत की, विचारवंत समीक्षक असोत, या सगळ्यांना घाई होते.

**भाजप आणि संघाच्या केडर, बूथ व्यवस्थापन आणि निवडणूक व्यवस्थापन कौशल्याच्या कौतुकाचे पूल बांधायची; तशीच, कथित सोशल इंजिनिअरिंग म्हणजे, जातीच्या राजकारणात कोण जिंकलं... याचा उहापोह करण्याची आणि सोबत मेलेल्या काँग्रेसपक्षावर अजून दोन–चार धपाटे घालायची.**

**हे सगळे भेकड आणि बुळगे विचारवंत ट्रोल होण्याला घाबरतात; का, आयोगाला घाबरतात की, आणखी कुणाला घाबरतात कुणास ठाऊक. झापडं ओढून बसलेल्या लोकांना साधे बेसिक प्रश्न पडत नाहीत की, मतदारांना हे तद्दन मूर्ख आणि बावळट समजतात ?**

हे तथाकथित लिबरल आणि विचारवंत पहिल्यांदा जोड्याने बडवले पाहिजेत.

जगभरात कागदी मतपत्रिका वापरल्या जात असताना, अमेरिकासुद्धा कागदी मतपत्रिका वापरत असताना आपल्याला मशीन्स का हव्यात आणि आपल्या निवडणूक यंत्रणेत काही दोष असू शकतात... हे तुम्ही मान्यच करत नाहीत, हा नेमका कुठला बोटचेपेपणा.

**नाशिक महानगरपालिका निवडणुकीत घडलेलं उदाहरण. एका अपक्ष उमेदवाराला शून्य मतं पडलेली... त्याचं मतदान, त्याच प्रभागात असताना. माणूस किमान स्वत:ला मतदान करेल? निदान त्याची लेकरं बायको मतदान करतील? शून्य मतदान? तरीही, हे भंगार लोक मशीन निर्दोष म्हणून टिऱ्या बडवतात. अशी वेळोवेळी अनंत उदाहरणं समोर आलेली आहेत.**

**२०१९च्या निवडणुकीत नेमकं किती मतदान झालं आणि किती मत मोजली गेली; याची अचूक आकडेवारी निवडणूक आयोगाला वेबसाईटवर टाकायला दीड वर्षे वेळ झाला, नाही तो कशामुळे? सगळं संगणकावर असताना दीड वर्षे का लागावीत?**

एक–दोन हजार नव्हेत; तर, १९ लाख ईव्हीएम मशीन्सचा हिशोब लागत नाही; त्याची याचिका कोर्टात अजूनही तशीच पडून आहे, कुठे गेलीत ती १९ लाख मशिन्स?

लोक बावळट असतील; पण, एवढेही बावळट नाहीत.

निदान शेतकरी नक्कीच माठ आणि बावळट नाहीयेत.

लखमीपूर खिरीमध्ये, जिथे शेतकरी चिरडून मारले, तिथल्या अठरा जागा भाजपने जिंकल्या.


त्याच जिल्ह्यात भाजपचे नेते फिरकत नव्हते, त्यांना अनेक ठिकाणी गावातून हुसकून लावलेलं होतं. शेतकरी चिरडून मारलेल्या गावात, आंदोलन सुरु असताना आणि त्यानंतर, ज्या पद्धतीने केंद्रीय मंत्री उद्दामपणे पदावर बसून राहिला... त्याबद्दल सातत्याने शेतकरी संताप व्यक्त करत असताना, अवघ्या सहा, आठ महिन्यांत झालेल्या निवडणुकांत लोक सगळे विसरुन भाजपला निवडून देतात? आणि, हे तुम्हाला पचतं?

**हाथरसमध्ये भाजपचा उमेदवार निवडून येतो? एवढं कांड झाल्यावर पण? गोरक्षकाच्या झुंडीने माणसं मारलीच; पण, तपास करणारा पोलीस अधिकारी पण मारला, नागरिकत्व–कायद्याच्या वेळेस, शेतकरी आंदोलनाच्या वेळेस प्रत्येकवेळेला सामान्य लोकांना तुडवून काढल्यावर पण, लोकांनी एवढं भरघोस मतदान केलेलं आहे?**

**विकासाच्या नावाने लोकांनी मतदान केलं, असले अचाट दावे लोक बेशरमपणे करतात. ११० रुपये पेट्रोल आणि १०० रुपये डिझेल घेऊन, ४५ वर्षातली सगळ्यात जास्त बेरोजगारी, बंद पडणाऱ्या कंपन्या आणि बुडणाऱ्या बँका घेऊन कसला कर्माचा विकास साधला जातोय? मतदानाला गेलेले भय्ये पुन्हा बोचके डोक्यावर घेऊन मुंबईत पोट भरायला येणार असतील; तर, लिहिणाऱ्या पत्रकाराची फटफटी काय पाण्यावर चालते काय ?**

बरं, हे झाल्यावर लगेच बिनतोड सवाल केला जातो, पंजाबमध्ये काय?





ममतादीदी वाजपेयी सरकारमध्ये मंत्री होत्या. त्यांचा राजकीय इतिहास जे विसरलेत आणि ज्यांना, त्यांना दुर्गा वगैरे उपमा द्याव्याश्या वाटतात, त्यांच्यासाठी हे तथ्य विसरलं जातंय का? बंगालमध्ये ममता दुसऱ्यांदा आल्या, त्यावेळी भाजप दुसऱ्या क्रमांकावर आलाय आणि काँग्रेस डावे संपले.

पंजाबमध्ये आपने भाजपचा पराभव केलाय का? तिथे काँग्रेस आणि अकाली दोन्ही संपले. भाजपला तिथं तसं पण गमवायला काहीही नव्हतं.

अतिशय गांभीर्याने सांगतोय, ममता दीदी आणि केजरीवाल... हे दोघेही एकाधिकारशाही पद्धतीने राज्य चालवणारे नेते आहेत, भलेही ते लोकशाही मार्गाने निवडून आलेले असले तरीही. प्रत्येकवेळेला, ज्या राज्यात भाजपला गमवायला काहीही नसतं, तिथेच दुसरा पक्ष निवडून येतो...हा योगायोग अतिशय दुर्मिळ आहे.

प्रत्येकवेळेला, सदोष निवडणूक यंत्रणेवर टीका केली की, भाजप निवडून न आलेलं एक राज्य दाखवून सगळे नामानिराळे होतात, जिथे भाजपला काहीच गमवायचं नव्हतं; तिथे गमवले कुणी, हा प्रश्न मात्र कुणालाच पडत नाही.

सगळे पत्रपंडित हिंदुत्व कार्ड चाललं म्हणून, बिल फाडून मोकळे होतात. त्यांच्याकडे, भाजपच्या ओस पडलेल्या सभा, मोकळ्या खुर्च्या, भाजप नेत्यांना झालेली गावबंदी आणि शेतकरी आंदोलनात असलेला लोकांचा आक्रोश, शेतकरी आंदोलनात दिलेली आश्वासन न पाळण्यामुळे जाहीरपणे शेतकऱ्यांनी केलेली टीका, यावर काय उत्तर आहे? हे सगळंच फक्त हिंदुत्व एवढ्याच मुद्द्याखाली कानाडोळा करावं इतकं सोपं आहे ?

युपीमध्ये मतपेट्या आणि मशीन्सची वाहतूक करताना झालेला गलथानपणा सगळ्यांनी पाहिलेला आहे, तिथं सुरक्षेसाठी गुजरात पोलीस का मागवले ? महाराष्ट्र पोलीस, छत्तीसगड पोलीस, तामिळनाडू पोलीस का नाही बोलावले ?

**ज्यांना ज्यांना म्हणून वरील प्रश्नांची समाधानकारक उत्तर सापडलेली आहेत, त्यांनी ती मांडावीत. आम्हाला राजकीय पंडितांएवढं ज्ञान नसलेही; पण, आम्हाला माणसांच्या जगण्याचे प्रश्न महत्त्वाचे वाटतात, अशा भारतातले आम्ही नागरिक आहोत. आम्हाला वरील प्रश्न पडलेले आहेत आणि त्याची उत्तरं आमच्यासाठी महत्त्वाची आहेत... या अशा, आणि यापुढे होणाऱ्या (झाल्याच तर) निवडणुका, निव्वळ धूळफेक असणारेत.**

**गुजरात मॉडेल नावाचा खोटारडेपणा करुन निवडून आलेले, १५ लाख फक्त जुमला होता म्हणणारे, फोटोशॉप करूनच प्रचार करणारे, मिडीयाला हाताशी धरून विखारी प्रचार करणारे, कोरोनाच्या आपत्तीमध्ये सुद्धा पीएम–केअर फंड काढून पैसे लाटणारे, स्वायत्त संस्था मोडीत काढून सगळ्या यंत्रणा बटीक करणारे लोक, निवडणुका नि:पक्ष आणि अतिशय अचूक करतात, यावर ज्यांचा भरवसा आहे अशा लोकांच्या बुद्धीला कोपरापासून दंडवत!**

***आनंद शितोळे***

आपल्या_धडावर_आपलेच_डोके
गंदा_है पर_धंदा_है
सीधी_बात
BanEVM_SaveDemocracy
BanEVM_SaveFarmers

# लाखो वर्षांपूर्वी माणसाची शेपटी गळून पडली आणि अलिकडेच, त्याची ‘जीभ’ही गळून पडलीय!

कहाणी सांगायचं निमित्त, अर्थातच, नुकत्याच संपन्न झालेल्या ‘१ मे... कामगार आणि महाराष्ट्रदिनाचा’ प्रतिवर्षी नियती घडवत असलेला एक अपूर्व योग, ज्यातून आम्ही काही बोध कधि घेतच नाही!!

**कम्युनिस्टांच्या, गिरणगावापासून संपूर्ण महाराष्ट्रात निनादत असलेल्या, ‘वर्गलढ्या’च्या लालरंगाच्या तुतारीने १९६०–७० पर्यंत राजकीयदृष्ट्या चांगल्यापैकी जागृत असलेल्या ‘कामगारा’मुळे, ‘कामगार’ या शब्दाला चांगली प्रतिष्ठा होती. त्यानंतर, महाराष्ट्रात उदयाला येऊ लागलेल्या राजकीय घराण्यांनी ‘कामगार’ या शब्दाविषयीच, भांडवलदारांची दलाली करुन (त्यातूनच, क्रांतिमैदान असलेली ‘लालबाग’, कधि ‘दलालबाग’ बनली कुणाला कळलंसुद्धा नाही) समाजात घृणा पसरवण्याचं षडयंत्र जोरात सुरु केलं आणि ते बव्हंशी यशस्वी झालं.** कामगार म्हणजे, आळशी–उद्धट–दादागिऱ्या करणारा बेजबाबदार–कामचोर समाजघटक, कमिटी–मेंबर म्हणजे युनियन–ऑफिसमध्ये फुटकळ गप्पा मारत जगणारी आयतोबी फुकटखाऊ जमात, कामगार म्हणजे, पगार–बोनसभत्त्यापलिकडे काडीमात्र वैचारिक कुवत नसलेले व त्यामुळेच चांगले राजकीय–कार्यकर्ते बनण्याबाबत बिनकामाचे, वगैरे वगैरे शेलकी विशेषणे उठताबसता लावत, या संपूर्ण कामगार–कर्मचारीवर्गाला अत्यंत पद्धतशीररित्या, महाराष्ट्रातल्या सत्तर–ऐंशीच्या दशकातल्या नव्या राजकीय–नेतृत्त्वाने, समस्त भांडवलदारांची ‘सुपारी’ वाजवत साफ बदनाम केलं... एकदा का बदनामीचा ऊरुस आटोपला की, मग कुणालाही ‘संपवणं’ फार सोप्पं काम होतं... झालंही अगदी तसंच, लालबागच्या ‘कृष्णा देसाई’ हत्येपश्चात, महाराष्ट्रातली अवघी कामगार–चळवळ मोडीत निघायला प्रथमच प्रारंभ झाला.

पुढे, या भाडवलदारांच्या ‘दलाल’ असलेल्या राजकीय नेत्यांच्या पक्षांनी भरपूर युनियन्स चालवल्या; पण, तो बक्कळ पैसा मिळवून देणारा ‘धंदा’ म्हणून चालवल्या! त्या युनियन्सनी जागोजागी भांडवलदारांशी उघड हातमिळवणी करत ‘मांडलिकत्व’ स्विकारलं आणि पाहता पाहता कामगार–चळवळ, फक्त एक केविलवाणी ‘वळवळ’ बनायला लागली.

**या विपरीत परिस्थितीत डॉ. दत्ता सामंतांच्या रुपाने, आपली ओळख आणि अस्मिता गमावलेल्या कामगार–चळवळीला, पुनश्च एक आश्वासक, आक्रमक व आरपार प्रामाणिक रुपडं लाभलं खरं... पण, त्या ‘डॉ. दत्ता सामंती’ चळवळीला, कुठलंही वैचारिक अथवा नैतिक अधिष्ठान दुर्दैवाने अजिबात नव्हतं!**

**सर्वसाधारणपणे, एका मालकाची एकच कंपनी असणं, या तत्कालिन पूरक औद्योगिक परिस्थितीमुळे आणि काँग्रेसफुटीच्या पार्श्वभूमीवर स्व. इंदिरा गांधींना महाराष्ट्रात हवा असलेला ‘डावा चेहरा’ म्हणून डॉ. दत्ता सामंतांना लाभलेल्या भक्कम ‘राजाश्रया’मुळे अल्पावधीतच डॉ. सामंतांच्या स्वतंत्र कामगार–चळवळीची घोडदौड चारही दिशांना सुरु झाली...** पण, गिरणीसंपाच्या निमित्ताने तो ‘राजाश्रय’ संपला आणि खाउजा’ (खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण) धोरणरेट्यात डॉ. सामंतांच्या स्वतंत्र कामगार–चळवळीला घरघर लागायला सुरुवात झाली... अशातच, डॉ. दत्ता सामंतांच्या हत्येनं कामगारांच्या संपांचं पर्व संपलं आणि चळवळही जवळपास संपली.

या मन सुन्न करणाऱ्या भीषण पार्श्वभुमीवर, माझ्यासारख्या

**...ही, ‘महाराष्ट्र’ नावाच्या आटपाटनगरीची दुर्दैवी कहाणी आहे. ही कहाणी आहे, तिथल्या ‘मराठी–माणसा’ची... म्हणजेच, मराठी कामगार–कर्मचारीवर्गाची!**



छोट्या पुढाऱ्याच्या ज्या गोष्टी प्रकर्षाने ध्यानात आल्या, त्या लाखो कामगारांचं नेतृत्त्व करणाऱ्या भल्या भल्या पुढाऱ्यांच्या ध्यानात आजवर का आल्या नाहीत किंवा ती त्यांची राजकीय–कुवत नव्हती की, नव्हती त्यांची ‘राजकीय–इच्छाशक्ती’?

.... यासंदर्भात, नव्वदीच्या दशकाच्या सुरुवातीलाच मला प्राधान्याने जाणवलेल्या काही गोष्टी पुढीलप्रमाणे....

१) **कामगार–चळवळीला मजबूत नैतिक व वैचारिक अधिष्ठान, हे अत्यावश्यक आहे आणि त्याविना, कामगार–चळवळ काही वर्ष सोडाच; तर, काही महिनेही टिकणं, अशक्य आहे आणि सर्वत्र तसं चित्र मौजूद होतंच....** आणि, म्हणूनच, श्रीकृष्णाचा जीवनसंदेश, शिवछत्रपतींची राजनीति, राष्ट्रपिता म. गांधींची ‘अहिंसे’ची संकल्पना व ‘दरिद्री–नारायणा’च्या पुनरुत्थानाची राष्ट्रीयप्रेरणा आणि बाबासाहेबांचा ‘समतेचा संदेश’ (ज्याला, संयुक्त राष्ट्रसंघाच्या सध्याच्या परिभाषेत ‘समृद्धी सर्वांची’ अथवा ‘Shared-Prosperity’ म्हटलं जातं), ही माझ्या कामगार–कर्मचारीवर्गाच्या चळवळीची चतुःसूत्री मी बनवली आणि काटेकोरपणे व अतिशय कटाक्षाने ती डोळ्यात तेल घालून अत्यंत कष्टपूर्वक, सतत जीव धोक्यात घालून अंमलात आणली. म्हणून, अनेक कंपन्यांमधून हजारोंच्या संख्येने कामगार–कर्मचारीवर्ग समृद्धीला पावला आणि कंत्राटीकरणाच्या भयंकर रेट्यातही ‘कायम’ कामगार म्हणून सुखसमाधानी जीवन जगला... पण, पुढे काय?

२) ‘कंत्राटी–कामगार पद्धती’, हा संपूर्ण कामगार–चळवळीला लागलेला मूळ रोग, ही ‘महाअवदसा’ असून ती महाराष्ट्रातल्याच नव्हे; तर संपूर्ण भारतातल्या कामगार–कर्मचारीवर्गाच्या अन्नात माती कालवेल.... हे बेंबीच्या देठापासून ठोठो बोंबाबोंब करत गर्जून मी सांगत होतो... पण, ऐकणारे कान नव्हते की, विचार करणारे मेंदू नव्हते उरले! आरक्षणासाठी महाराष्ट्रभर निघालेल्या असंख्य ‘मराठा महामोर्चां’च्या विषयपत्रिकेवर, हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा नसावा, हे केवढं दुर्दैव!!

कंत्राटी–कामगार पद्धतीविरुध्द ‘धर्मयुद्ध’ पुकारत, त्याच प्रश्नावर मी लोकसभा–विधानसभा निवडणूक २००९ साली लढवली; पण, ८०% कामगार–कर्मचारीवर्ग असणाऱ्या मतदारसंघाने त्यांच्यासाठी तहहयात लढणाऱ्या नेतृत्त्वाला राजकीय–जागृतीअभावी नाकारले.

कामगार, ‘कामगार’ म्हणून मतदान करायला तयार होत नाही, तोवर हे चित्र बदलणं केवळ अशक्य! जगातलं राजकारण कामगार आणि कामगार नेते चालवतात... पण, आपल्या इथे जातधर्मावर, सर्जिकल–स्ट्राईकवर, राष्ट्रपुरुषांच्या पुतळ्यांवर, मंदिर–मस्जिदीवर आणि फाजील अस्मितेवर राजकारण चालतं... एकवेळ, संसद–विधिमंडळात रोजगारनिर्मितीवर चर्चा होते; पण, तो रोजगार, ती नोकरी कुठल्या लायकीची असावी, यावर सगळेच प्रस्थापित राजकीय पक्ष मूग गिळून असतात! अशातऱ्हेनं, ‘राजकीय वटवृक्षा’चा आधार नसलेल्या कामगार–चळवळ नावाच्या वेलीला... उत्तरोत्तर, पायदळी तुडवणं, भांडवली–व्यवस्थेला अगदीच सोप्पं काम झालं!

३) **युरोप–अमेरिकेत जसे निम्नतम वेतनमान आणि सर्वोच्च वेतनमान यात १ : १२ ते १ : २० इतक्या गुणोत्तराचा आग्रह धरला जातो (जे गुणोत्तर, आपल्याकडे १ : १००० च्याही पलिकडे आहे)... त्यासाठी, राष्ट्रीयस्तरावर मोठ्या चळवळी होतात,...** *पृष्ठ क्र. ७ वर*

**जनतेमधून 'सार्वमत' (Referendum) घेतलं जातं. इथे भारतात मात्र, त्याचा साधा उल्लेख नाही, चर्चा नाही... मग, तशी धोरणं कुठून राबवली जाणार? म्हणून, आपल्याकडे 'किमान-वेतन', हे धड बेकार-भत्त्याच्याही लायकीचं नसतं आणि असं, तुटपुंज 'किमानवेतन', एकही पैसा खर्च न करता १०० वर्षांचं एकत्र केलं; तरच, कुठे ठाणे, पुणे, मुंबईसारख्या शहरांमधून 1BHK फ्लॅट घेणं शक्य होईल, अशी ही १० × १० च्या कोंदट कोंडवाड्यात रहाणाऱ्या शहरी श्रमिकांची मोठी शोकांतिका होय!**

अमेरिकेत (युरोपसह सर्वच प्रगत राष्ट्रांमध्येसुद्धा) 'किमान-वेतन' प्रति तास ७.२५ ते १५ डॉलर्स या हिशोबाने, आठवड्याचे तेथील कामाचे एकूण तास ४० धरले तर, महिन्याचं 'किमान-वेतन' रु.९०,०००/- ते १,८०,०००/- (सरासरी रु. दिड लाख) असतं आणि जर, आपल्याकडच्या प्रमाणे आठवड्याचे कामाचे तास ४८ धरले तर, रु.१,००,०००/- ते रु.२,१५,०००/- (सरासरी रु. पावणे दोन लाख) इतकं ते मोठं होईल.

विशेष बाब म्हणजे, अमेरिकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष श्री. जो बायडेन यांनी त्यांच्या कार्यकाळाला १०० दिवस पूर्ण होत असताना, संपूर्ण अमेरिकेतील सगळ्याच राज्यांमध्ये 'किमान-वेतन' प्रति तास १५ करण्याची हाक दिलेली आहे आणि कामगार-संघटनांच्या (Unions) अधिकच्या बळकटीकरणासाठी कामगार-कायद्यात अनुकूल बदल करण्याचे स्पष्ट संकेत दिलेत ! भारतातल्या कुठल्या पंतप्रधान, कुठल्या मुख्यमंत्र्याने, असं काही अखिल कामगार-कर्मचारीवर्गासाठी भरीव, भरघोस योगदान देलंय कधि किंवा देतील कधि?

**४) इथे वेतनमान वाढणं दूर राहीलं; पण, तंत्रज्ञान प्रगत झाल्यामुळे कामगार-कर्मचारीवर्गाचे जगभरात कामाचे तास कमी होतं असताना, आपल्याकडे गंगा उलटी वहातेय. सध्या, आपल्या अर्थव्यवस्थेची केवळ 'जॉबलेस-ग्रोथ'(Jobless Growth) अशी वाटचाल नसून, तंत्रज्ञानाचा बेसुमार व गैरवापर करत 'जॉबलॉस-ग्रोथ'(Jobloss Growth) हा भयंकर 'कॉर्पोरेट-फंडा' चालू झालाय... एकीकडे कंपन्यांच्या वार्षिक उलाढाली वाढत चालल्यात; तर, दुसरीकडे नोकऱ्यांची संख्या मात्र, अद्ययावत तंत्रज्ञानामुळे घटत चाललीय, अशी जीवघेणी विसंगती आपल्या अर्थव्यवस्थेत निर्माण झालीय. त्यामुळे, (६ ÷ ४ = २४ अशा) सर्वांसाठी सहा तासांच्या शिफ्ट्स् होणं (ज्यातून, ३३% बेकारीदेखील आटोक्यात येईल आणि सार्वजनिक वहातूक व्यवस्थेवरचा ताणही कमी होईल), ही काळाची गरज असण्याच्या पार्श्वभुमीवरचं, हे मन सुन्न करणारं चित्र आहे.**

५) युरोप-अमेरिकेत (उदा. फ्रान्स, स्पेन, जर्मनी, स्विट्झर्लंडमध्ये) 'किमान-वेतन' नुसतचं गलेलठ्ठ नाही; तर, ते परदेशातील कामगारांनाही देणं बंधनकारक आहे; अन्यथा, तेवढं न देणाऱ्या व्यवस्थापकास तत्काळ तुरुंगवास भोगायला लागतो... अनुचित कामगार प्रथा अथवा Unfair Labour Practiceचा अवलंब (उदा. व्यवस्थापनाने युनियनबाजीत बेकायदेशीर हस्तक्षेप करणे, बेकायदा कंत्राटी-कामगार पद्धत राबविणे, कामगार-कर्मचारीवर्गाची जाणिवपूर्वक छळवणूक करणे व त्यांच्यात बेकायदेशीर पक्षपात करणे, करार मोडणे वगैरे वगैरे) केला तर, व्यवस्थापकीय मंडळींची थेट तुरुंगात रवानगी होते. आपल्या इथली यासंदर्भातील पद्धत मात्र, आमच्या कायदे करणाऱ्या खासदार-आमदारांनी जाणिवपूर्वक वेळखाऊ व कचखाऊ ठेवल्यामुळे, 'अनुचित कामगार प्रथेचा अवलंब केल्या'बद्दल कुणा व्यवस्थापकाला इथे घडलाय कधि तुरुंगवास?

**त्यामुळेच, आज भांडवलदार, ब्रह्मा, विष्णू, महेश बनलेत... ठेविले अनंते, तैसेचि रहावे, या उक्तिनुसार आता, ठेविले कंपनी व्यवस्थापने, तैसेचि रहावे, ही नवी औद्योगिक व सेवाक्षेत्रा-तली 'गुलामगिरी' सगळीकडे आलीय!** 'मार्केट-प्राईस'(Market price)च्या फसव्या बुळबळीत आवरणाखाली कामगार-कर्मचारीवर्गाचा लिलाव (Labour rbitrage) सगळीकडेच उघडपणे बेलाशक पुकारला जातोय आणि कुठून विरोधाचा सोडाच, पण, साधा निषेधाचा शब्दही उमटायला तयार नाही! अनपढ साधा श्रमिक असो वा असो उच्चशिक्षित अभियांत्रिकी अथवा माहिती-तंत्रज्ञान (I.T.) क्षेत्रातला तंत्रज्ञ... सगळेच सध्या एका जहाजावरचे प्रवासी बनलेत!

HR/IR व्यवस्थापकिय मंडळींचा एक 'अदृश्य हात'(आठवा, डम स्मिथचा बाजारपेठेतला भांडवली 'अदृश्य हात'), बाजारु-किंमतीच्या (मार्केट प्राईस) गोंडस नावाखाली सगळ्या कामगार-कर्मचारीवर्गाचा खिसा, कसलेल्या 'खिसेकापू'सारखा कायम कातरत असतो; पण, दिशाहिन कामगार-कर्मचारीवर्गाला ते धड उमगत नाही आणि त्यामुळे, ते संघटनेशी एकतर फटकून तरी रहातात किंवा संघटनेशी बेईमानी करुन संघटनाच संपवतात व स्वतःचं व इतरांचं भविष्य बरबाद करतात.

'कंत्राटी-पद्धती'च्या सापळ्यात अडकल्यामुळे, शेक्सपियरच्या 'हॅम्लेट' या नायकाच्या टू बी ऑर नॉट टू बी (To be or not to be) या स्वगताच्या परिभाषेत बोलायचं तर, लग्न करावे की, न करावे (To marry or not to marry) या विवंचनेत अवघ्या महाराष्ट्राचा शिक्षित-अर्धशिक्षित नवतरुणवर्ग सध्या आहे... उंदराप्रमाणे 'कंत्राटी' सापळ्यात अडकलेला तरुण कंत्राटी कामगार-कर्मचारीवर्ग, ही महाराष्ट्राची नवी दुर्दैवी ओळख बनलीय!

काश्मीरमधला आतंकवाद एकवेळ परवडला; पण, उद्योग-सेवा क्षेत्रात 'स्मशान-शांतता' पसरवणारी सध्या सर्वत्र प्रचलित असलेला 'कंपनी-दहशतवाद' (Corporate-Terrorism) हा जास्त खतरनाक (भाडोत्री बाऊन्सर्सचा सढळ वापर तसेच, कामगार खातं व इतर संबंधित सरकारी यंत्रणा यांच्याशी साटंलोटं करुन कायदेकानून धाब्यावर बसवून निर्माण केली जाणारी)! करोडो आत्म्यांचा आक्रोश बनलेली ही, राष्ट्रीय दृष्टीकोनातून सर्वात मोठी व भयंकर समस्या असतानाही, राजकीय-प्रशासकीय व्यवस्था तर सोडाच; पण, देशात अस्तित्वात असलेल्या लाखो NGOs देखील त्याविषयी अवाक्षरसुद्धा काढत नाहीत... कारण, पुन्हा तेच, क्षुद्र स्वार्थापोटी या सगळ्यांचीच जीभ गळून पडलीय! लहानसहान व खरंतरं, राजकीय-प्रशासकीय व्यवस्थेचे विषय असलेल्या, नसत्या भानगडीत गुंतून समाजसेवेचा आपला तथाकथित कंड शमवत, देशातल्या सगळ्यात मोठ्या समस्येकडे दुर्लक्ष करणाऱ्या आणि अन्यायी-अत्याचारी व्यवस्थेविरुद्ध तोंडातून 'ब्र'सुद्धा न काढणाऱ्या या लाखो छत्र्जी करायच्यात काय? फक्त, बक्कळ देणग्यांमधून आपली आर्थिक सोय लावत व स्वतःचं फसवं समाधान करत, या 'संस्थान' बनलेल्या खाजगी स्वयंसेवी-संस्था (NGOs), शोषक-अन्यायी राजकीय-प्रशासकीय व्यवस्था बळकट करण्याचंच काम करतात! या सरंजामी व्यवस्थेतले बडे बडे सरकारी अधिकारी आपल्या जबाबदाऱ्या न्यायालयांवर ढकलून मोकळे होताहेत, हेच चित्र सगळीकडे दिसतंय... न्यायालयं काय काय म्हणून कामं करतील?

**'कामगार' नावाचा उल्लेख असला; तरी, कामगार खातं, नक्की काय काम करत आणि कुणासाठी राबतं, हा मोठा संशोधनाचाच विषय आहे. संप करायची कामगारांनी चुकूनमाकून कधि नोटीस दिलीच तर, झोपेतून जागं झाल्यागत तत्परतेनं त्यात अडथळे उभं करणारं हे कामगार-खातं, एरव्ही कामगारांच्या पोटतिडकीच्या प्रश्नांवर अगदी षंढ आणि थंड असतं! कामगार-सचिवांना, कामगार-मंत्र्यांना, कामगार आयुक्त-उपायुक्तांना भेटा; नाहीतर, शेकडो निवेदनं द्या... तरीही, बेकायदेशीररित्या सर्वत्र सर्रासपणे चालू असलेल्या 'कंत्राटी-कामगार पद्धती'बाबत ते ढिम्म् हलणार नाहीत. राजकारणी, कामगारांच्या हितासाठी कायदे करायला तयार नाहीत, उलटपक्षी जे थोडेबहूत शिल्लक आहेत, तेही ते रद्द करु पहातायत.... कामगार कायदे म्हणजे, मालक कायदे, कामगार खातं म्हणजे, मालक खातं, ही भीषण परिस्थिती आहे.**

'कंपनी-दहशतवादा'मुळे (Corporate-Terrorism), हाताळणीच्या दृष्टीने कामगार-चळवळीच्या ताकदीबाहेरचे, हे विषय झालेत. कामगार-कर्मचारीवर्गामध्ये थोडी जरी राजकीय-जनजागृती निर्माण झाली; तरी, हे षडयंत्र तत्काळ मोडून काढता येईल... 'धर्मराज्य पक्षा'चे आमदार-खासदार संसदेत, विधिमंडळात निवडून गेले तर, कामगारांच्या केसाला धक्का लावायची आहे कुणाची बिशाद?

एवढा सगळा प्रकोप आणि करोडो आत्म्यांचा आक्रोश असतानाही सगळीकडे 'स्मशानशांतता' कशी? तर, त्याचं उत्तर हेच की, पूर्वी आपल्याकडे जेव्हा, 'सतीप्रथा' होती; तेव्हा, पतीच्या जळत्या चितेवर बळी चढवली जाणाऱ्या स्त्रीचा भयंकर आक्रोश कुणाच्या कानी पडू नये म्हणून मोठमोठे ढोल बडवले जायचे... आता, कामगार-कर्मचारीवर्गाचा कामाच्या ठिकाणचा आक्रोश कानी पडू नये आणि त्यांचा त्यांनाही ऐकू येऊ नये म्हणून, टीव्हीवर गाण्याबजावण्याच्या विविध स्पर्धा, दहीहंड्या-गरबे-सार्वजनिक गणेशोत्सव/पूजा वगैरेंचा वर्षभराचा रतीब, कुठले न् कुठले सतत सुरु असलेले क्रिकेटचे सामने, मंदिर-मस्जिदीसंबंधी (उदा. राममंदिर बांधणी वगैरे) भावनिक कल्लोळ, राजकारण्यांच्या एकमेकाविरुद्धच्या आरोप-प्रत्यारोपांचा गदारोळ... याची व्यवस्थेकरवी छान तजवीज केली जाते आणि या अशा गलबलाटात, हा करोडो आत्म्यांचा आक्रोश कुठून कानी पडावा?

**निर्भीड, कणखर साहित्यिका दुर्गा भागवत म्हणायच्या, कामाठीपुऱ्यातल्या एका 'गिल्डर लेन' नावाच्या अरुंद गल्लीने, एका बाजुला आमच्यासारख्या घरंदाज स्त्रिया आणि विरुद्ध बाजुला पोट जाळण्यासाठी देहविक्रय करणाऱ्या स्त्रिया... असा मोठा दुर्दैवी भेद निर्माण केला. अगदी तस्साचं भेद, कंत्राटी आणि कायम, या व्यवस्थापकिय 'शकुनी-भेदनीति'च्या दोन शब्दांनी काम गारांनी स्वतःमध्ये हकनाक करुन घेतलाय... त्यातूनच सध्या, औद्योगिक जगतात, कामगारचं कामगारा-चा खरा शत्रू बनलाय... मालक,** *...पृष्ठ क्र. ११ वर*

# नरेंद्र मोदी से शी जिनपिंग का दिल एकदम खूष और राहुल गांधी के नाम से ही दिल की धडकन तेज क्यूँ...???

चीनचे आजन्म हुकूमशहा शी जिनपिंग यांना भारतातल्या 'एक्झिट-पोल'च्या निकालाने (खरंतर, तद्दन बनावट), एवढा ऊरभरला आनंद होण्यामागचं नेमकं कारण काय?

**गलवान-खोऱ्यातील भारताचा ४००० चौ.कि.मी. हून अधिक भूभाग जबरदस्तीने बळकवणाऱ्या शी जिनपिंग यांच्याविरुद्ध बोलताना पं. नरेंद्र मोदींची जीभ का अडखळते व पं. नरेंद्र मोदी बालीसारख्या दूरवरच्या ठिकाणी, १७व्या G-२० बैठकीचं निमित्त साधून, याच शी जिनपिंग यांना अर्धा-पाऊण तास भेटतात, ती भेट भारत-सरकार आणि 'गोदी-मिडीया'तून लपवली का जाते??**

**चीनच्या १९६२च्या आक्रमणाबाबत नेहरुंवर उठसूठ तोंडसुख घेणाऱ्या भाजपाई-संघीय लोकांची, चीनची भारतासंबंधी अत्यंत आक्रमक भूमिका व जोरजबरदस्ती पाहूनही, त्याविरुद्ध ब्र काढताना बोबडी का वळते???**



''घोडा का अडला, पानं का सडली व भाकरी का करपली'', या तिन्ही प्रश्नांचं उत्तर जसं एकच, 'न फिरवल्यामुळे' हे आहे...तसंच, चीनसंदर्भातील वरील तिन्ही प्रश्नांचं एकच उत्तर आहे आहे, ते म्हणजे, '''दिल्लीश्वरां'च्या खासमखास गुजराथी-भांडवलदारवर्गाच्या आर्थिक-हितसंबंधांच्या सुरक्षेसाठीच केवळ (भारत देशाच्या नव्हे)''!

चीनच्या 'ग्लोबल-टाईम्स'मध्ये या तथाकथित एक्झिट-पोलबाबत चीनने अतिशय आनंद प्रकट केला असून, ''भारताचे चीनबाबतचे परराष्ट्र-धोरण पूर्वीसारखेच (म्हणजे, चीनच्या व 'दिल्लीश्वरांना प्रिय' अशा मोजक्या उद्योगपतींच्या हिताचं...मग, देश आणि देशाचे हितसंबंध, देशाचं कल्याण व सुरक्षितता चुलीत गेली तरी हरकत नाही, अशी देशविघातक-देशद्रोही वृत्ती) कुठल्याही राजकीय अडथळ्यांविना तसेच चालू राहील''...याबाबत, समाधान व्यक्त केलंय.

जगात पूर्वीसारखे 'अमेरिका-रशिया' असे दोन गटतट नसून, चीन मध्यंतरीच्या काळात जगातल्या स्वस्त उत्पादनाचं केंद्र बनून व आपलं लष्करी-सामर्थ्य प्रचंड वाढवून एवढा मोठा झालाय की, आता जगात 'अमेरिका विरुद्ध चीन', असे दोन गट तयार झालेत आणि अगदी, रशियाला सुद्धा चीनला सांभाळून घ्यावं लागतं (रशियन तेलाच्या विनिमय दराबाबत चीनची दादागिरी खपवून घ्यावी लागते), त्याचा सतत आधार घ्यावा लागतोय. **चीनचा छुपा अजेंडा व मुखवटा, जगासमोर उघडा होण्याअगोदर, जागतिक-शांतताप्रिय अलिप्ततावादी परराष्ट्र-धोरण राबवणाऱ्या पं. जवाहरलाल नेहरुंनी चीनवर विश्वास टाकणं, अगदी स्वाभाविक होतं. पण, चीनची रसातळाला गेलेली विश्वासार्हता व षडयंत्री कारभार, सूर्यप्रकाशासारखा जगासमोर सातत्याने उघडा पडत असतानाही... आपल्या 'भांडवलदार-मित्रपरिवारा'चे आर्थिक-हितसंबंध जपण्यासाठी (Crony-Capitalists) देशाचं हित गहाण टाकणं, हा 'देशद्रोह' नव्हे काय? केवळ चीनशीच नव्हे; तर, ज्याविषयी भारत-सरकार व 'गोदी-मिडीया' मूग गिळून गप्प बसलेला असतो; त्या चीनच्याच ताब्यातील 'हाँगकाँग'शी (जो अर्थव्यवहार, चीनपासून स्वतंत्रपणे वेगळा दाखवला जातो) आपल्या देशाचा अर्थव्यवहार काळजीपूर्वक तपासून पहाणाऱ्याला 'हिरा-उद्योगा'तून होणारे करोडो-करोडोंचे 'हवाला-व्यवहार' व त्या व्यवहारांचे छुपे 'लाभार्थी' कोण, याचं सामान्य ज्ञान होईल व जबरदस्त धक्का बसेल!**

***...राजन राजे***

---

## लाखो वर्षांपूर्वी माणसाची शेपटी गळून पडली... ...पान क्र. १० वरुन

**व्यवस्थापनं, हे त्याचे नंतरचे शत्रू होतं!**

'कंत्राटी-कामगार' जणू जिवंत हाडामांसाची माणसंच नव्हेत, अशा आविर्भावात कंपन्यांमधून उरलेसुरले 'कायम' कामगार-कर्मचारी, त्यांच्या प्रति, अत्यंत संवेदनशून्यतेनं वागताना दिसतात व फक्त, आपल्या नोकऱ्या टिकतील कशा आणि पगार-बोनस वाढतील कसे, एवढाचं आत्यंतिक स्वार्थी, संकुचित व नीच दृष्टीकोन बाळगतात... जे नेमकं, फोडा आणि झोडा या कुटील नीतिने, या सगळ्या बदमाष व्यवस्थापकिय मंडळींच्या, चांगलंच पथ्यावर पडतं! त्यात, बहुसंख्य कंपन्यांमधून 'कमिटी-मेंबर' (यात, अनेक चांगले अपवादही असतात, पण, सुक्याबरोबर हे ओलं जळून जाताना पहावं लागतं) नावाची स्वार्थी, अज्ञानी 'बांडगुळं' (जी बहुशः, कामगारांनी नव्हे तर, कंपनी-दहशतवादाच्या बळावर, लोकशाहीतत्त्वाचा साफ गळा घोटून HR/IR व्यवस्थापकिय मंडळींनीच निवडलेली असतात) स्वतःचा स्वार्थ, फुकटचा मिळणारा मोठेपणा जपण्यासाठी सगळीकडे सर्रास कामगारांचा घात करतात (अशांना, आपल्या व्यवस्थापकीय-स्वार्थासाठी हवा भरुन तट्ट फुगवण्यात व्यवस्थापकीय मंडळी एकदम वाकबगार असतात आणि गरज संपली की, त्यांना बऱ्याचदा टिश्यू पेपरसारखं लागलीच वापरुन फेकूनही देतात).

**१७५७ची प्लासीची पहिली लढाई मोजक्या सैनिकांनिशी इंग्रज जिंकू शकले, ते केवळ 'मीर जाफर'च्या गद्दारीनेच! खुर्ची आणि पैसा, या रॉबर्ट क्लाईव्हने अचूक टाकलेल्या जाळ्यात अडकून 'मीर जाफर'ने देश विकला आणि देशाला १५०-२०० वर्षांच्या गुलामगिरीत ढकलण्याच्या 'महापातका'चा तो धनी बनला... आज असे अनेक मीर जाफर उद्योग-सेवा क्षेत्रातील आस्थापनांमध्ये जागोजागी पैदा झालेत आणि प्रत्येक कंपनी-व्यवस्थापन, कामगार-संघटना मोडून काढण्यासाठी असे अवसानघातकी 'मीर जाफर' सहजी हुडकून काढतातच.... मग, लोखंडाचे हिणकस कण (सोन्याचे कण नव्हे) चुंबकाभोवती गोळा व्हावेत; तसेच, एका 'नीचात्म्या' भोवती, अनेक 'नीचात्मे' संधि साधत आपसूक गोळा होऊ लागतात आणि संघटना घडवण्यापेक्षा, संघटना फोडणं, हे लाखपटीने सोपं काम असल्याने, प्रत्येक ठिकाणच्या कामगार संघटनेला स्वाभाविकच घरघर लागत जाते. या अशा नीच-नराधमांमुळेच, आता महाराष्ट्रात कुठेही खऱ्या अर्थाने कामगार-संघटना चालवणं, ही जवळपास अशक्य कोटीतली बाब बनलीय... कामगार-चळवळीचं 'श्राद्ध' घालण्याच्या महापातकाचे जे अनेकजण 'धनी' आहेत; त्यात, हीच 'मीर जाफरी' वृत्तीची गद्दार मंडळी सर्वत्र आघाडीवर आहेत!**

**तेव्हा, कुणी बोध घेवो अथवा न घेवो, कुणाचा 'जीभ' नावाचा अवयव शिल्लक असो वा नसो... १ मे, आंतरराष्ट्रीय कामगार आणि शिवछत्रपतींच्या महाराष्ट्राचा स्थापनादिन, हा देवदुर्लभ योग साधत, कोविड-१९ महासंसर्गजन्य साथीच्या अवघड स्थितीतही, जनजागृतीचं यज्ञकुंड चेतवत ठेवणं, हे आमचं 'धर्मकर्तव्य' आहे आणि ते आम्ही कुठल्याही परिस्थितीत पार पाडणारच!**

***....राजन राजे*** (अध्यक्ष: धर्मराज्य पक्ष)

# एक पत्थर तो तबियत से उछालो यारों...

खासदार व अभिनेत्री कंगना रणौतला ६ जून रोजी चंदीगड विमानतळावर महिला CISF कुलविंदर कौरने थप्पड मारली. कुलविंदर कौर ३५ वर्षाची असून, ती दोन मुलांची आई आहे. त्याच विमानतळावर तिचा पतीही कार्यरत आहे. प्रस्तुत घटनेची दखल घेऊन कुलविंदरला नोकरीतून निलंबित केले गेले आहे. तसेच तिला अटक झालेली आहे आणि आता त्यावर कोर्ट इन्क्वायरी सुरु होणार आहे. या संदर्भात, या घटनेचा निषेध आणि स्वागत करणाऱ्यांची घमासान चर्चा सोशल मीडियावर सुरु आहे.

कुलविंदरने कायद्याच्या दृष्टिकोनातून गुन्हा केला आहे, असे मत मांडणाऱ्यांचीही संख्या पुष्कळ आहे. त्याचबरोबर, कुलविंदरने जे केलं ते योग्य आहे, असं म्हणणाऱ्यांचीही संख्या भरपूर आहे. कुलविंदरचे कुटुंबिय, तिचे सारा गाव तसेच पंजाबमधील आणि महाराष्ट्रामधील अनेक लोक तिच्या पाठीशी उभे राहिलेले आहेत. महाराष्ट्रातील काही संघटना, तिचा सत्कारही करणार आहेत. तिची नोकरी गेली असेल तर, तिला बॉलीवूडमध्ये काम दिलं जाईल, अशी ऑफरही कुणी दिलेली आहे. तर, एका बिझनेसमनने एक लाखाचे बक्षीस तिला जाहीर केलेले आहे. तिला अनेक ठिकाणी नोकरीच्या ऑफर्सही येत आहेत.

**आजपर्यंत अनेक नगरसेवक, खासदार, आमदारांनी सुपाऱ्या देऊन किती जणांना ठार मारले आहे, अपमानित केले आहे, खळ्ळखट्याक करुन त्यांच्या इस्टेटीवर कब्जा केलेला आहे?**

**मीरा–भाईंदरची नगरसेविका गीता जैन...ही, एका तरुण अभियंत्याला थप्पड मारुन, वर सर्वांसमोर अपमानास्पद बोलून स्वतःच्या कृतिबद्दल जराही खेद व्यक्त न करणारी मग्रूर स्त्री! कोणत्या अधिकारात तिने हे कृत्य केले हा जाब विचारला तेव्हा?**

**शेतकरी आंदोलनात रस्त्यावरती खिळे ठोकले गेले. त्या शेतकऱ्यांवर अश्रुधूर सोडला गेला. त्यांच्यावर लाठीमार झाला, त्यांची नाकेबंदी करण्याचा पूर्ण प्रयत्न केला गेला... त्याचे काय?**

**अयोध्येत मंदिर बनवताना जो हमरस्ता तयार केला गेला; त्यासाठी, २२०० दुकाने, ८०० घरं, ३० मंदिरं, ९ मशिदी, ६ दर्गे तोडले गेले आहेत. बेघर झालेल्या स्त्रियांचे व्हिडिओ उपलब्ध आहेत. हे सर्व घडत असताना निषेध करावा, अहिंसेचे तत्त्व आठवावे, असं आज कंगनाची बाजू घेऊन येणाऱ्या आणि कायद्याची चिंता पडलेल्यांना कसं काय वाटलं नाही?**

कंगना, कायमच विवादाच्या भोवऱ्यात राहिलेली आहे. तिचे ट्विटर–अकाउंट तिच्या प्रक्षोभक विधानांमुळे काही काळासाठी स्थगितही केले गेले होते. किसान आंदोलनात तिने किसानांच्या विरुद्ध अत्यंत अश्लाघ्य उद्गार काढलेले आहेत.

किसान आंदोलनात धरणं धरुन बसलेल्या, एका ८० वर्षाच्या स्त्रिला तिने 'बिल्किस बानो', असे संबोधले आहे. शंभर रुपयासाठी ही स्त्री आंदोलनात धरणं धरुन बसलेली आहे, असेही ती म्हणालेली आहे. बिल्किस, जिच्यावर बलात्कार केले गेले आणि आजही जिची वणवण संपलेली नाही, त्या मुस्लिम स्त्री संदर्भातला कंगनाचा तिरस्कारच



**आपल्या हतबल–हतबुद्ध जगण्याच्या बुडातला 'अंगार' आणि जगण्याच्या अगतिकतेच्या अंतरंगात दडपला गेलेला; पण, तरीही, उसळी मारुन बाहेर पडण्याची संधि शोधणारा 'ज्वालामुखी'... अग्नी किंवा तेज, या पंचमहाभूताची दोन्ही रुपं, एकाचवेळी उरी जपणारी 'लीना पांढरे' नावाची 'एक स्त्री'...'कुलविंदर कौर' नामक दुसऱ्या स्त्रिचं, दुर्गेसदृश रौद्र रुप पाहून, आतून मोकळीढाक होते आणि समाजमाध्यमातून प्रत्ययकारी 'बोलकी' होतेय!**

**...काही वर्षांपूर्वीच्या जागतिकस्तरावरील मचश ढे', या लैंगिक–अत्याचार पीडित, महिला–प्रस्फुटीकरणाच्या शृंखला–प्रक्रियेला चालना देणाऱ्या उद्रेकाची आठवण करुन देणाराच जणू, हा ऐतिहासिक प्रसंग...समस्त अन्याय–अत्याचार–शोषणग्रस्त महिलावर्गाला ''एक 'थप्पड' तो तबियत से मारो'', असं गर्जून सांगतोय....**

**मात्र, लीनाजींनी वर्णिलेला 'अँग्री यंग मॅन' अमिताभ बच्चन, फक्त पडद्यावरच सत्ताधाऱ्यांना–गुंडांना बडवत व्यवस्था–विद्रोह गाजवत असतो...प्रत्यक्ष व्यवहारात मात्र, सचिन तेंडुलकरला बगलेत मारुन, करोना–काळात, नरेंद्र मोदींच्या एका इशाऱ्यावर 'टाळ्या आणि थाळ्या' बडवत रहातो, हे आपलं व आपल्या देशाचं दुर्दैव आहे... तर, अमिताभसारखाच 'लीनाजींनी न वर्णिलेला'; पण, 'तनुश्री दत्ता' व तत्सम इतर अभिनेत्रींच्या कथित लैंगिक–शोषणाबाबत अनंत अपराधी असणारा व व्यवस्थेला तसाही संपूर्ण शरणागत असणारा...पण, हिंदी चित्रपट–पडद्यावर मात्र, 'अँग्री–विद्रोही स्टार' असलेला एक 'मुखवटेबाज' मराठी–नट, फक्त 'भूसा भरलेलं भोत' असल्याचंही आपल्याला स्मरल्याखेरीज रहात नाही...हीच, लीनाजींच्या लेखणीची ताकद आहे!**

***...राजन राजे***

यातून व्यक्त होतो. तसेच, ८० वर्षाच्या वृद्ध स्त्रीबद्दल तिला खरेदी करता येईल, असे असे तुच्छतावादी अनुद्गार तिने काढलेले आहेत... हा अपमान, सर्व स्त्रियांचाआहे. कुलविंदरची आई, या शेतकरी आंदोलनामध्ये सहभागी होती, त्यातील अत्याचाराचा राग, कुलविंदरच्या मनामध्ये धुमसत असणारच. तिने मारलेली 'थप्पड', ही संपूर्ण शेतकरी–समूहाच्या 'सामूहिक नेणिवे'चे प्रक्षेपण आहे!

**क्रांति, ही बंडखोरी मधूनच होत असते. साधी माणसं त्यांचा राग, संताप, प्रेम, दुःख मोकळेपणाने व्यक्त करतात. पुढील परिणामांचा विचार कॅलक्यूलेटेड पद्धतीने करत नाहीत. एका खासदार स्त्रिला थप्पड ठेवून देणे, याला हिंमत लागते, पागलंपण लागतं... या कृतीचा परिणाम म्हणून नोकरी जाईल, अटक होईल, आपल्या लेकरांचं काय होईल...** हा कुठलाही विचार, या स्त्रिने केला नाही. लोक तिला सपोर्ट करोत अथवा न करोत; पण, तिची लढाई ती हिंमतीने नक्कीच लढणार आहे .तिच्या या एका कृतीतून, अधिकार पदावर बसणाऱ्या, सत्तेचा माज असणाऱ्या लोकांना संदेश गेला आहे की, त्यांचं बेताल वक्तव्य आणि वर्तन खपवून घेतले जाणार नाही.

चॉकलेट हिरोंचे हिंदी सिनेमातील पर्व संपवून जेव्हा, 'अँग्री यंग मॅन' अमिताभ बच्चन पडद्यावरती अवतरला. तेव्हा, कोट्यवधी सामान्य लोकांना आपली इच्छापूर्ती झाल्याचा आनंद मिळाला. कारण, सामान्य माणूस सत्ताधाऱ्यांना गुंडांना बडवून काढू शकत नाही, विजयी होऊ शकत नाही. काही वर्षांपूर्वी दूरदर्शनवरील प्रिया तेंडुलकरची 'रजनी' ही मालिका, यामुळे लोकप्रिय झाली होती.

मला स्वतःला कुलविंदर कौरला कडकडीत सलाम ठोकावासा वाटतो; कारण, मला आयुष्यभर तिच्यासारखं वागता आलं नाही. नोकरी आणि इतर हितसंबंध सांभाळण्यासाठी, संसार आणि लेकराबाळांच्या काळजीने, कर्जांच्या हप्त्यांचा विचार करता करता आणि फक्त, भाकरीच नव्हे; तर, 'भाकरीवरील लोण्या'च्या मागेही धावताना... अनेक तडजोडी कराव्या लागल्या. अनेक उच्चवर्गीय, उच्चवर्णीय पांढरपेशा नोकरदार संसारी माणसांप्रमाणे अनेक ठिकाणी 'शेपूट' घालावी लागली...कान पाडावे लागले म्यॉव म्हणावे लागले. आपला आत्मा सैतानाला विकावा लागला.

माझ्याप्रमाणेच अनेक पांढरपेशी, मध्यमवर्गीय, उच्चमध्यमवर्गीय, उच्चशिक्षित, नोकरदार माणसं... हा समझोता करतात आणि म्हणतात ''कौन कहता है की हम रोटी खा रहे है, असल में रोटी हमे खा रही है !''

**आपल्या बिल्डिंगमध्ये आलेल्या रामनल्लाच्या नावाने अक्षता वाटणाऱ्या समूहाला हाकलून लावण्याचे धाडस दाखवणारे, मोदींचे घोटाळे आणि अण्णा हजारेचे घोटाळे, न्यायाधीश लोयांचा खुनी अमित शहा आहे असे पुस्तक लिहिणारे निरंजन टकले, हिंदू व मुस्लिम दोन्हींकडून हल्ल्याची भीती असतानाही निडरपणे कविता लिहिणारे व जाहीर कार्यक्रम सादर करणारे जावेद अख्तर... यांना फक्त मनोरंजन म्हणून युट्यूबवर ऐकून आणि वाचून सोडून द्यायचे असते का?**

...पृष्ठ क्र. १३ वर

**(ठाण्यातील प्रख्यात रेडिऑलॉजिस्ट असणाऱ्या माझ्या जिवलग मित्राने, कुणी आनंद देवधर नावाच्या भाजपाई-संघीय प्रणालीत घोटून तयार झालेल्या व्यक्तिचा, विद्वेषपूर्ण-विखारी संदेश पाठवला, ज्यात सरतेशेवटी उद्धव ठाकरे यांच्याविषयी असणाऱ्या सहानुभूतीची लाट फक्त स्टुडिओमध्येच होती की काय? असा सात्विक संताप जागा करणारा क्षुद्रवृत्तीचा प्रश्न होता... व त्यावर, व्यक्त होण्याची मला विशेषत्त्वाने विनंती मित्राने केली...म्हणूनच, हा संयुक्त संदेश-प्रपंच!)**

मी सुरुवातीलाच हे सांगतो की, उद्धव ठाकरे यांच्याविषयी असणाऱ्या 'न्याय्य' सहानुभूतीची लाट, जी आनंद देवधरच्या अधू नजरेला स्टुडिओमध्येच फक्त दिसली...ती, प्रत्यक्षात EVMच्या हातचलाखीत, ईडी-आयटी-सीबीआयच्या देशभरातल्या बेकायदेशीर दडपशाहीत, इलेक्टोरल-बॉण्डच्या आजवरच्या जगातल्या सर्वात मोठ्या घोट्याळात, निवडणुकीची आदर्श-आचारसंहिता सरळ सरळ धाब्यावर बसवून भाजपाकडून केल्या गेलेल्या जातधर्मीय विद्वेषी प्रचाराच्या राळीत व धुळीत आणि निवडणूक-आयोग नावाच्या अंपायरला 'चिकी खायला' घालून दडपली गेली होती... आणि, हे शोधण्यासाठी आनंद देवधरने दुर्बिणसुद्धा लावायची गरज नाही; फक्त, आपला चष्मा शोधून वापरावा व डोळे फारच अधू झाले असतील; तर, तेवढा झालेला मोतीबिंदू किंवा काचबिंदू, नेत्रतज्ज्ञाकडून शस्त्रक्रिया करवून काढून टाकावा, बस्स!

**हे भाजपा-संघवाले निवडणुका हरले की, शहामृगासारखं टक्केवारीच्या वाळूत कायम चोच खुपसून बसतात. पण, ही डँबिस लोकं जिंकली की, मग सोयिस्करपणे टक्केवारी बाजुला सारत, किती जागा जिंकून आणल्या...याचा सारीपाट मांडून बसतात व जो जिता, वहीं सिकंदर म्हणतात! कारण, तेव्हा टक्केवारीचं गणित, त्यांना फारसं हितावह ठरत नसतं. उदा. २०१९च्या लोकसभा-निवडणुकीत यांना जेमतेम ३७% मतं पडली होती; म्हणजेच, देशातली ६३% जनता मोदी-सरकारच्या विरोधात होती; मग त्याबाबत, हे लोकं काही स्वतःहून बोलले का? तेव्हाच नेमकी, यांची दातखीळ कशी बसते??**



उद्धवजी ठाकरे, ज्या तडफेने प्रचाराला लागले; त्यामुळेच, काँग्रेस आणि शरद पवार यांच्या कार्यकर्त्यांमध्ये, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतसुद्धा, दुर्दम्य आत्मविश्वास निर्माण झाला आणि ते उत्साहाने कामाला लागले. उद्धवजी, या प्रचंड मोठ्या संकटाने खचून गेले असते; तर, महाराष्ट्रात या निवडणुकीत विरोधी पक्ष, नावालादेखील शिल्लक राहिला नसता, हे सूर्यप्रकाशासारखं स्पष्ट आहे... तेच, भाजपाई-संघीय लोकांचे मनसुबे होते व ते उद्धवजींनी आपल्या वज्रनिर्धाराने साफ ढासळवून टाकलेत आणि हेच खरंतरं निरतिशय महत्त्वाचं आहे. पण, हे भाजपाई-संघीय, त्याविषयी ब्र काढणार नाहीत.

त्याचबरोबर, यांची संपूर्ण 'भांडवली व प्रशासकीय व्यवस्था' हाताशी धरुन, बेकायदेशीरपणे व हडेलहप्पी पद्धतीने 'निवडणूक-मॅनेज' करण्यातली बदमाषीही मोठ्याप्रमाणावर, या सगळ्या त्यांच्या तथाकथित यशाला कारणीभूत असतानाही, उद्धवजींनी किल्ला यशस्वीरित्या लढवला, हे नाकारणं...हाच यांचा 'पिढीजात करंटेपणा' होय!

ना हे, आणि ना, यांचे पूर्वसुरी... कधि कुठे लढे लढले (उदा. भारतीय स्वातंत्र्ययुद्ध)...ही षडयंत्री लोकं, केवळ आपल्या कटकारस्थानांमुळेच तात्पुरती का होईना; पण, राजकारण-समाजकारणात आजवर यशस्वी होत आलीत... They can't and can never work on the 'human-strength', they only shamelessly work on 'human-weakness' ...तिचं या खुज्या लोकांची मर्यादा, तेवढीचं त्यांची लायकी!

***...राजन राजे***

**(हाच तो खालीलप्रमाणे संदेश, ज्यावर मी उपरोल्लेखित जळजळीत उत्तर दिलंय.....)**

झुंजल्या सेना अशा....

लोकसभा निवडणुकीत सर्वात रंगतदार लढती होणार होत्या शिवसेना विरुद्ध शिउबाठा. एकूण १३ जागांवर शिंदे आणि ठाकरे एकमेकांना भिडले.नतीजा काय झाला ते बघा.

शिवसेनेने शिउबाठाला ७ ठिकाणी हरवले.
थोडक्यात ही अत्यंत महत्त्वपूर्ण लढत शिवसेनेने ७-६ अशी जिंकली. या गोष्टींची मिडियामध्ये फार चर्चा झाली असेल असे वाटत नाही. कारण मिडियाचे डार्लिंग असलेले उद्धव ठाकरे यांच्या विरोधात ही गोष्ट जाते.

शिवसेनेने १५ जागी उमेदवार दिले होते त्यापैकी ७ निवडून आले तर, उद्धव ठाकरे यांनी २१ ठिकाणी उमेदवार दिले आणि ९ निवडून आले.

विजयाची टक्केवारी
शिवसेना ४७%
शिउबाठा ४३%
पडलेली एकूण मते.
शिवसेना ६२.६६ लाख
शिउबाठा ६०.३९ लाख
विजयी उमेदवारांचे सरासरी मताधिक्य
शिवसेना १०६९१५
शिउबाठा ८६९४४

याचा सरळ सरळ अर्थ असा आहे की, प्रत्येक बाबतीत शिवसेना शिउबाठापेक्षा वरचढ ठरली आहे.

उद्धव ठाकरे यांच्या विजयाला खूप मोठी हिरवी किनार आहे हे विसरून चालणार नाही. जिथे मुसलमान उमेदवार होता त्या औरंगाबादमध्ये खैरे यांचा दारुण पराभव झाला आहे.

उद्धव ठाकरे यांना जिव्हारी लागणारा पराभव हा, चंद्रकांत खैरे यांचा असेल आणि त्या खालो-खाल विनायक राऊत यांचा. मुंबईबाहेर शिवसेनेची वाढ औरंगाबाद येथे झाली तर, कोकण तर ठाकरेंचा बालेकिल्ला समजला जातो.

शिवसेनेचे मुंबईतील यश मुस्लिम मतदारांमुळे मिळाले आहे हे सप्रमाण सिद्ध झाले आहे.

आज जरी उद्धव ठाकरे कितीही फुशारक्या मारत असले तरीही त्यांचे भविष्य कठीणच आहे. याचे कारण काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार दोघांनी मिळून लक्षणीय यश मिळवले आहे. विधानसभेच्या जागा वाटपात उद्धव ठाकरे यांची नक्की कोंडी होणार आहे. जेमतेम १०० जागा लढवता आल्या तरी खूप झाले अशी परिस्थिती असेल.

उद्धव ठाकरे यांच्याविषयी असणाऱ्या सहानुभूतीची लाट फक्त, स्टुडिओमध्ये होती की काय?

**...आनंद देवधर**

## एक पत्थर तो तबियत से उछालो यारों...

*...पान क्र. १२ वरुन*

**कुठलंही पाठबळ नसताना, एक सामान्य स्त्री विद्रोह करते; तेव्हा, तो दबल्या गेलेल्या कष्टकरी समूहाच्या नेणिवेतील सामूहिक उद्गार असतो! नैतिकदृष्ट्या थप्पड मारावीशी वाटणे योग्य आहे; पण, कायदेशीरदृष्ट्या चुकीचे आहे... अशा पद्धतीने दोन्ही डगरीवर मला पाय ठेवायचे नाहीत. कसला कायदा? कुठला कायदा? प्रचंड विषारी असणाऱ्या नागिणीसाठी कायदा? दुग्धपानं भुजंगानाम् केवल विषवर्धनम्!**

दारावर घोळका करुन येणाऱ्या आणि गणपती-नवरात्राची वर्गणी मागणाऱ्यांना आयुष्यभर घाबरुन मी वर्गणी देत आले आणि चकरा मारायला नको; म्हणून सरकार दरबारी पैसे सरकवतं आले, 'बॉस इज ऑलवेज राईट' म्हणून पंगा घेणं टाळत आले, एक खाडकन लगवावी, असं वाटत असताना सुद्धा खडीसाखरी बोलत आले. मुलं मोठी झाल्यावर मात्र, मी बंडाचे निशाण फडफडवले आणि त्यामुळे, अर्थातच बदल्या, कटकटी अंगावर ओढवून घेतल्या.

५५ व्या वर्षी नोकरी बदलली; तेव्हा, नवीन नोकरीमधे पेन्शनला त्रास होऊ नये म्हणून नास्तिक असून, भाजप विरोधी असून अयोध्या राम मंदिराला ५ हजाराची देणगी सुद्धा दिली. त्याची पावती येथे शेअर करते आहे आणि जाहीर पाप कबुली देते आहे!

त्यामुळे, कुलविंदर कौरला माझा दिल से सलाम!

***...लीना पांढरे***

## मोदी-शाह जोडगळीचा लपलेला अजेंडा:

# भाजप संघटनेला डावलून सत्तेची घाई

**मोदी-शाह जोडगळीला जेलमध्ये जायचे नाही, त्यामुळे सर्व संवैधानिक आणि पक्षीय पातळीवरील प्रक्रिया डावलून मोदींना सत्तेच्या बोहल्यावर चढण्याची घाई झालीय; संघ, भाजपाला न विचारता, चर्चा न करता गुजराती लॉबीचा परस्पर खेळ का सुरू आहे? जाणून घ्या सारे काही ...**

**सर्वात आधी, मोदींना स्वतः या पराभवाची जबाबदारी घ्यायची नाही. त्यामुळे त्यांनी तडकाफडकी महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस हे आपले लाडके कळसूत्री प्यादे पराभवाची जबाबदारी घ्यायला पुढे केले. त्यामुळे मोदींना पराभवाची जबाबदारी घ्यायला लावण्याचा जोर कमी होईल. दुसरीकडे आपसूक योगी आदित्यनाथ यांच्यावर उत्तर प्रदेश पराभवाची जबाबदारी स्वीकारण्याचा दबाव येईल. अर्थात योगी-फडणवीस यांचा पराभवाशी अर्थाअर्थी काडीचाही संबंध नाही. तिकीट वाटपापासून सर्व खेळ अमित शाह यांनी केले. प्रचारात फक्त मोदींचा चेहरा वापरला गेला आणि त्यांनी ''मी-मी'', ''मैं-मै'' करत निवडणूक लढली. ''मोदींना मत'' मागितले गेले. भाजपाला गुंडाळून ठेवले गेले. आता संघाची गरज नाही, असे जाहीरपणे सांगण्यापर्यंत इथपर्यंत गुजराती लॉबीची मग्रुरी, अहंकार वाढला. ''एनडीए सरकार'' हा तर, निवडणूक लढताना विषयच नव्हता. ''या निवडणुकीतील पराभव, हा मोदींना नाकारणारा जनादेश आहे,'' असे संघ आणि संघटन पातळीवर भाजपाला स्पष्टपणे वाटते.**



संघाने मोदींना जबाबदारी स्वीकारायला लावण्यासाठी दबाव वाढवला आहे. काल नागपुरात संघाची तातडीची बैठकही झाली. या बैठकीत असले कुबड्यांचे, खिचडी सरकार चालवू नये, असा एक मतप्रवाह संघात, भाजपात आहे. ''इंडिया''ला सरकार बनवू द्या, नंतर बघू, असा हा मतप्रवाह आहे. दुसरीकडे, सत्ता घ्यायची असेल तरी पंतप्रधानपदी मोदी नको, असा सूर आहे. त्यादृष्टीने नितीन गडकरी, मध्यप्रदेश एकहाती शत-प्रतिशत जिंकवून देणारे शिवराजसिंह चौहान, राजनाथ सिंह यांची नावे चर्चेत आली आहेत. नितीन गडकरी यांचे नाव चर्चेत येताच गुजराती लॉबीने फडणवीस यांना राजीनामा नौटंकी करण्याचे आदेश दिले.

गडकरी, शिवराज, राजनाथ, वसुंधरा ही पक्षातील विरोधी मंडळी सक्रिय होण्याच्या आधीच मोदींना खुर्चीवर जाऊन बसायचे आहे. त्यामुळेच त्यांनी हाता-पाया जोडून तातडीने नितीश-चंद्राबाबू यांना दिल्लीत बोलावून समर्थन पत्र मिळवले. त्यानंतर उतावीळ मोदी हे निवडणूक आयोगाने राष्ट्रपतींना निवडणूक प्रक्रिया संपविल्याचे संवैधानिक चौकटीत अधिकृतरित्या कळवण्यापूर्वीच राष्ट्रपती भवनात पोहोचले. (ही सगळी घाई करताना मोदींनी बायपास केलेल्या सगळ्या प्रोसेस नेमक्या काय आहेत, ते पुढे विस्ताराने दिले आहे.)

आता, ही मोदींची घाई का? आपण जर लवकर पंतप्रधानपदाच्या खुर्चीत जाऊन बसलो नाही, तर आपल्याला जेलमध्ये जायला लागतेय, हे मोदी-शाह पक्के जाणून आहेत. त्यामुळेच भाजप संघटन, संघ हे सक्रिय होण्याच्या आत, त्यांना वेळ न देता मोदींना बोहला गाठायचा आहे. अर्थात ते तितके सोपे नाही. ''मोदी हे देशातील सर्वात बोगस नेते आहेत,'' ही चंद्राबाबू यांची विचारधारा आहे. मोदींनी गुजरात दंगल घडवून आणली असा आरोप करत त्यांचा राजीनामा मागणारे चंद्राबाबू हे पहिले नेते! नितीश यांच्याबद्दल तर बोलायलाच नको. हे दोन्ही नेते मुस्लीम आरक्षणाचे समर्थक आहेत. त्यावर सविस्तर नंतर कधीतरी चर्चा करू.

**अयोध्येत पराभवानंतर आता विकृत अंधभक्त देशातील हिंदूंनाच शिव्या घालत आहेत. मोदींनी तर परवा संबोधनात ''जय श्रीराम''ला तलाक देत ''जय जगन्नाथ''चा नारा दिला. उत्तर प्रदेशने लाथाडले आणि ओडिशाने सत्ता दिली म्हणून या माणसाने ''जय श्रीराम''च सोडून दिले. कसले हे हिंदुत्व? मोदी आता भगव्या जॅकेटमध्ये नव्हे तर हिरव्या जॅकेटमध्ये दिसू लागले आहेत. त्यांच्या बॅकड्रॉपला उर्दूमध्ये गठबंधन सरकारची अक्षरे दिसू लागली आहेत. ताठ कण्याचे मोदी पटेल, शिंदे आणि तटकरे यांच्यासारख्या सामान्य वकूबाच्या माणसांसमोर झुकताना दिसत आहेत. चंद्रा-नितीश यांचे तर, पायच धरायचे बाकी राहिले आहेत. हे अध:पतन आहे. अहंकार, माज, मग्रुरी पुरती ठेचली गेली आहे. मात्र, काहीही करून, कुणाच्याही हाता-पाया जोडून संघ-भाजप सक्रिय होण्याआधी मोदींना पंतप्रधानपदाच्या खुर्चीवर जाऊन बसायचे आहे. तसे झाले नाही तर, त्यांना शाहांच्या सोबतीने जेलमध्ये उर्वरित आयुष्य घालावे लागेल. शिवाय, अदानी यांचा बाजार उठण्याची भीती असल्याने संपूर्ण गुजराती लॉबी सक्रिय झाली आहे.**

परवाचा मोदींचा संबोधन कार्यक्रम हा, भाजपाचा नव्हता तर, गुजराती लॉबीचे आयोजन होते. अयोध्येत पराभव का झाला? तर, स्थानिक लोकांना हद्दपार करून तिथे गुजराती मंडळींना घुसडण्यात आले आहे. सर्व व्यवसाय, ठेके हे गुजराती ठेकेदार, कंत्राटदारांना देण्यात आले आहेत. अयोध्येतील ८०% हिंदू जनता आणि भगवान श्रीराम असेच नाही कोपले. सत्तेचा हा खेळ मोदी-शाह यांना वाटतो तितका सोपा नक्कीच नाही. ज्या संघाला यांनी डावलले, ज्या सरसंघचालक मोहन भागवत यांना गुंडाळून ठेवले, ज्या भाजप पक्ष संघटनाला फाट्यावर मारले, ते काय गप्प बसणार आहेत काय? हे काय कमी की काय, समोर तेल लावलेला पैलवान तयार आहेच. जाता-जाता आणखी एक - चंद्राबाबू यांचा या दुनियेतील सर्वात बेस्ट फ्रेंड कोण आहे, ते माहीत आहे का तुम्हाला? अखिलेश यादव!

**संघ-भाजपाला डावलून, अतीव घाईत, पंतप्रधानपदाच्या बोहल्यावर चढण्यासाठी उतावीळ मोदींनी बायपास केल्या या सगळ्या प्रोसेस**

**१.निवडणूक आयोगाला राष्ट्रपती भवनात जाऊन अधिकृतरित्या राष्ट्रपतींना कळवावे लागते की, लोकसभा निवडणूक प्रोसेस संपली आहे.**

**२. त्यानंतर नव्या लोकसभेचे गठन केव्हा करायचे ते अधिसूचित केले जाते.**

**३. पंतप्रधान राजीनामा देतात आणि त्यानंतर राष्ट्रपती त्यांना काळजीवाहू पंतप्रधान म्हणून काम करण्यास सांगतात.**

**४. राष्ट्रपती सर्वात मोठ्या पक्षाला सरकार बनवण्यासाठी निमंत्रित करतात.**

**५. सभागृहात बहुमत सिद्ध करण्यासाठी (फ्लोअर टेस्ट) साधारणतः आठवडाभरापासून ते २-३ आठवड्याचा कालावधी दिला जातो. अर्थात, राष्ट्रपती स्वतःच्या अधिकारात ही मुदत सहा महिन्यापर्यंत लांबवू शकतात. (तसे आजवर कधी झालेले नाही!)**

**६. राष्ट्रपती/घटनेच्या पातळीवरील या प्रोस्यूजरशिवाय इतर घटना पक्षीय पातळीवर घडतात - जर गठबंधन सरकार येणार असेल तर, सर्व पक्ष मिळून आधी निमंत्रक निवडतात.**

**७. त्यानंतर सर्व सहभागी घटक पक्षांचा किमान समान कार्यक्रम निश्चित होतो.**

**८. गठबंधन पक्षांची बैठक होते आणि त्यात संसदीय दलाचा नेता निवडला जातो.**

**९. सहभागी सर्व घटक पक्ष नव्याने निवडलेल्या नेत्याच्या नेतृत्त्वात आपापसात सहमतीने खातेवाटप व इतर पदांबाबत ठरवतात.**

*-विक्रांत पाटील* (पत्रकार)

# जैन व्यक्तीने मुस्लिम नाव घेत १२४ बकरे वाचवले, पण गुजरातमधील मुस्लिम नरसंहाराच्या वेळी कुठे होते अहिंसेचे तत्त्व?

कोणीतरी जैन व्यक्तीने मुस्लिम नाव वेश धारण करून, तब्बल १२४ बकरे खरेदी करून त्यांची जीव हत्या होण्यापासून वाचवलं...

अहिंसा परमो धर्म:

या तत्वाला अनुसरून....

त्यानिमित्ताने काही प्रश्न.....

तुमच्या लोकसंख्या बहुल गुजरातमध्ये....

जनावरांपेक्षा हालहाल करून मुस्लिम स्त्री-पुरुष कापले जात असताना....

कितीतरी जणांना जिवंत जाळले जात असताना...

स्त्रिया, वृद्ध, कुमारी बालिकांवर सामूहिक बलात्कार होऊन त्यांची हत्या होत असताना..

गरोदर स्त्रियांची पोटे फाडून त्यांचे गर्भ त्रिशूळवर नाचवले जात असताना...

तुम्ही त्याला प्रतिकार करणे सोडा...

साधी शांती यात्रा काढून हिंसक जमावाला थांबवण्याचा एकही प्रयत्न का केला नाही???

अहिंसक मार्गाने जो नृशंस मुस्लिम नरसंहार सुरू असताना....

तुम्ही अहिंसक मार्गाने आंदोलन का केलं नाही?

भारत आज बिफ एक्सपोर्टमध्ये जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे...

त्या बनावट मुस्लिम नावाने चालवल्या जाणाऱ्या बिफ एक्सपोर्ट कंपन्यांचे मालक... बहुतांशी तुमचे न्याती बांधव आहेत त्याचं काय?

मणिपूरमध्ये जो सामूहिक नरसंहार झाला...

त्यावेळी तिथं जावून एखादा शांती मार्च का काढू शकले नाही??

बरं...

हेतुपुरस्सर मुस्लिम सणांच्या वेळी तुम्हाला अहिंसा सुचते; मग हाच अहिंसक विचार बिगर-मुस्लिम समुहांच्या यात्रा, आषाढी जत्रा, उरूस, गटारी अमावस्या किंवा धुळवड यावेळी सुद्धा सर्रास कितीतरी द्वीपाद चतुष्पाद प्राण्यांची हत्या होतेच...

मग त्यावेळी तुम्हाला अहिंसा परमो धर्म: ला अनुसरून का आंदोलन करावं वाटत नाही

भारतात एकूण जवळपास ८५% लोक मांसाहार करतात,

त्यातील १५% मुस्लिम वगळता बाकीचे जे ६०% टक्के बिगर-मुस्लिम लोक आहेत त्यांच्या मांसाहारबद्दल किंवा जिथं सामिष अन्न असणाऱ्या सणासुदीला तुम्ही कधी विरोध केलेला ऐकिवात नाही...

मग उणेपुरे केवळ दोनच मुस्लिम सणांच्या वेळी. तुमच्यातील अहिंसक का जागा होतो?

म्हणजे मांसाहार करणारे १५% मुस्लिम चुकीचे आणि बाकीचे ६०% बिगर मुस्लिम बरोबर...

हे कसलं अजब गृहितक?

बरं...

कोणी काय खावं आणि काय खावू नये याचे अधिकार भारतीय घटना संविधान यांनी दिले असताना...

ही नस्ती उठाठेव कशासाठी??

ज्याने त्याने आपल्याला आवडेल तो धर्म स्वीकारून त्यानुसार वर्तन प्रार्थना, श्रद्धा, आस्था धारण करून स्वतःला आवडेल, रुचेल ते खान पान करावं, असे मूलभूत अधिकार भारतीय राज्यघटनेने बहाल केले असताना...

ही बळजबरी आणि जुलूमाचा रामराम का आणि कशासाठी???

कोण उठतो प्रतीकात्मक कुर्बानी करा म्हणतो..

कोण उठतो जीवहत्या करू नका म्हणतो...

म्हणजे या लोकशाही देशात नेमकं चाललं काय आहे?

कुणाचा पायपोस कुणाला राहिला नाही....

एकंदरीत बहुसंख्यांक नावाखाली अल्पसंख्य समुहावरील हे सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक वर्चस्व....

समता आणि समानता या घटनेच्या मूळ उद्दिष्टांना हरताळ फासणारे आहे...

जग आणि जगू द्या हे साधे सोपे सरळ तत्वज्ञान असताना...

की जाणूनबुजून वाकडी वाट का आणि कशासाठी???

जय हिंद, जय महाराष्ट्र...

डॉ. अमन पटेल... शिव शाहू फुले आंबेडकर विचारधारेचा पाईक...

जाता जाता.... कुर्बानी माध्यमातून मुस्लिमांना लक्ष करीत, पशूहत्येवर गळे काढणारे दुर्दैवी मृत्यूवर...दात काढीत निर्लज्जपणे हसत होते.

---

“राममजन्मभूमी-अयोध्येत राममंदिर-परिसरातील सायकल-स्टॅण्डपासून बव्हंशी सगळीच कंत्राटं व तेथील बहुतेक बांधकाम, पायभूत-प्रकल्पांची कंत्राटं; तसेच, स्थावर-मालमत्ता मालकी गुजराथ्यांची”...एवढ्यावरच, ‘कर लो दुनिया मुट्ठी में, हे गुज्जू भांडवली-प्रकरण थांबत नाही; तर, उत्तरप्रदेश पोलिसभरती परीक्षा-पेपरफुटीबाबत आरोपित कंपनीदेखील गुजराथची असल्याचं निष्पन्न होतंय. अशिक्षित-अडाणी म्हणून गणले जात असले; तरी, राजकीयदृष्ट्या सजग असलेले भैय्ये, उत्तर प्रदेशात गुजराथ्यांचा पायरव टिकू देत नव्हते...पण, एक अयोध्येचं राममंदिर होतं काय आणि ढोंगी ‘हिंदुत्वा’च्या आड आर्थिक-राजकीय स्वार्थ साधण्याचा ‘सिम सिम खुल जा’, असा उत्तर दिशेचा दरवाजा गुजराथी-भाषिकांसाठी उघडतो काय...गुजराथी-भांडवलदारांची एकच लाईन लागून जाते, ती शेतीसाठी सुपीक व कारखान्यांसाठी अत्यंत स्वस्त मजुरांचा मुबलक पुरवठा असलेला प्रदेश, काबीज करण्यासाठी!

जसा, महाराष्ट्र (‘मुंठापुराना’...मुंबई, ठाणे, पुणे, रायगड, नाशिक-नागपूर) येथील भ्रष्ट व दलाल मराठी-राजकारण्यांना हाताशी धरुन गुजराथ्यांनी पूर्ण ताब्यात घेतला...त्याच शोकांतिकेचा प्रयोग, उत्तर भारतीय भूमीवर सुरु झालाय!

## FIR against Gujarat-based firm must be made public: Akhilesh

**The Hindu Bureau**
LUCKNOW

Samajwadi Party (SP) president Akhilesh Yadav on Friday raised questions about the Uttar Pradesh police recruitment exam paper leak and its connection with a Gujarat-centric company.

He suggested that the Gujarat-based firm which conducts the police recruitment exam paper is involved in leaking the paper and only after its owner fled abroad, the State government came to know about it.

“It is the identity of the ‘BJP’, they work for cheaters. The allegation is very serious that the Gujarati company which conducts the police recruitment exam paper is involved in leaking the paper,” Mr. Yadav said on X. He added that the U.P. government informed the public about it and blacklisted the company only as eyewash to avoid public anger.


Akhilesh Yadav

“The Uttar Pradesh government should make public the copy of the First Information Report against that company and its owner. Show the courage and recover the cost from their property. Such criminals are guilty of ruining the future of 60 lakh youth of Uttar Pradesh. The BJP government should prove whether they are with these criminals or with the people of the State,” Mr. Yadav asked.

The SP president pushed for the investigation of every external company working in the State.

The SP president demanded preference be shown towards U.P.-based companies in work.

# आनंद शितोळे लिहितात :

दोन घटना, दोन भारत, दोन निकाल (निकाल वेगळा आणि न्याय वेगळा)

**पहिली घटना**

अरविंद केजरीवाल, पदावर असणारे मुख्यमंत्री. भ्रष्टाचाराचे आरोप, ईडीच्या नोटिसा, अटक, जामीनाला विरोध. जामीन मिळाल्यावर मुदत संपल्यावर पुन्हा जेलमध्ये.

कोर्टाचे म्हणणे, कायद्याच्या समोर सगळे समान

**दुसरी घटना**

बी. एस. येडीयुरप्पा, कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री अल्पवयीन मुलीचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप, अटक वॉरंट जारी. पॉक्सोची कलम लागू. अटकपूर्व जामिनासाठी अर्ज. जामीन मंजूर, अटक नाही. कोर्टाचे म्हणणे, येडीयुरप्पा कुणी सामान्य माणूस नाहीये. हे दोन भारत आहेत.

स्त्रीला देवी समजणाऱ्या अतिसंस्कारी पक्षाच्या मांडवात उभे राहा, मग वाट्टेल ते करा, अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण करा, माणस गाडीखाली चिरडून मारा किंवा पीडित मुलीच्या बापाला मारून टाका. ऑलिम्पिक पदक मिळवणाऱ्या मुलींचे लैंगिक शोषण करा, तुम्ही सुटणार हे नक्की.

**तुम्हाला कोणता भारत हवाय ?**

तुमच्या मुलींवर दुर्दैवाने अशी वेळ आली तर तुम्हाला कोणता भारत हवाय ?

ज्याची_लाज_त्याचाच_माज

आपल्या_धडावर_आपलेच_डोके

सबका_नंबर_आयेगा

भांडवलदारांना, नसते कुठली 'निती', ना पिढ्यापिढ्यांच्या भविष्याचा विचार, ना कुठला धर्म, ना कुठला 'देश'... त्यांना 'प्यारा' असतो फक्त, नफ्याचा 'धनादेश'! निती असलीच तर, असते स्वार्थप्रेरित 'बदलती-निती' (Flexi-bel Ethics)...त्यामागे असतो सिगरेटच्या थोटकासारखा बाजारु 'स्पर्धा-यशस्विते'चा तोकडा विचार, आपल्या कंपन्या-उद्योगधंद्यांचा उघडानागडा-विकृत स्वार्थ...राक्षसी नफ्याचा कधिही न संपणारा हव्यास आणि त्यामागे दडलेला सैतानी 'अभिनिवेश'! खाजगी कंपन्यांच्या मालकांपासून ते तेथील कामगार-कर्मचारीवर्गाच्या कामावर नियंत्रण ठेवणाऱ्या सुपरवायझरपर्यंत आणि 'भांडवलशाही' संकल्पना-धोरणं आखणाऱ्या राजकारणीवर्गापासून ते ती राबवणाऱ्या निर्णयक्षम शासकिय-प्रशासकियवर्गापर्यंत... सगळेच 'भांडवलदार' म्हणून गणले जातात!

*...राजन राजे*


THE HINDU

## Gujarat Congress accuses State govt. of land allotment scam

**The Hindu Bureau**
AHMEDABAD

Gujarat Congress chief Shaktisinh Gohil on Sunday accused the State BJP government of massive corruption and irregularities in the allotment of land plots by the Gujarat Industrial Development Corporation (GIDC) in Dahej and Saykha industrial zones.

In a press conference on Sunday, Mr. Gohil, sharing government documents, said that the GIDC – the nodal agency for the industrial development in the State – is allotting lands at a subsidised rate of ₹2,845 per square metre in Dahej instead of holding auction which can fetch up to ₹10,000 per square metre.

"Dahej is a highly developed zone with all the infrastructure and other facilities. Two years ago, Asian Paints had purchased lands at ₹7,000 per square metre plus transfer fees, stamp duty and other expenses. But GIDC is now allotting lands at mere ₹2,845 per square metre, thus causing massive revenue loss to the public treasury," Mr. Gohil said

Shaktisinh Gohil

Mr. Gohil accused GIDC officials of "taking money" from the industries in return of allotment at subsidised rates. "It's a case of money laundering in which the GIDC and Industries department are causing revenue losses to the exchequer while indulging in corruption," he said.

'गोदी-मिडीया'त कुठे, ही बातमी दिसली असल्यास जरुर कळवावे... गुजराथ, ही नियमाने 'औरंगजेबा'सारख्या नृशंस-नराधम व्यक्तित्वांची जन्मभूमी; तर, अपवादाने 'मोहनदास करमचंद गांधी'सारख्या महात्म्याची! जागतिकस्तरावरील युरोपियन-भूमीसारखीच, एक देशांतर्गत 'पातकी-भूमी'च ती, जिथे यश, फक्त 'सत्ता आणि मत्ता' या दोन पारड्यातच तोललं जातं, ज्याला न्याय-नीतिमत्तेशी काडीमात्र देणंघेणं कधि नसतं...माफिया-संस्कृती, भ्रष्टाचार, आर्थिक-घोटाळे, धार्मिक-विद्वेष, पैशाचा उन्माद आणि उर्वरित भरतभूमीचं गोचिडासारखं शोषण करत त्यावर यथेच्छ 'गुजराण' करणारा लांछनास्पद प्रदेश म्हणजे 'गुजराथ'...आणि, सोबतच देशासाठी कधि एक थेंबभरही रक्त न सांडवणाऱ्या आत्यंतिक स्वार्थप्रेरित व्यापारी-जमातीचाही हा प्रदेश होय...!!!

**...केवळ, आपल्या जातधर्मपंथाचा, आपल्या पक्ष-प्रदेशाचा म्हणून, उमेदवाराला मतदान करणार्यांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारं, असं काही...अर्थात, त्यामुळे अशा अज्ञानी जीवांचं, महामूर्ख 'अंधभक्ता'चं डोकं ठिकाणावर येऊन त्यांचे डोळे तत्काळ उघडतील, ही आशा निरर्थकच!**





**मोदी-शाहांच्या भाजपाई केंद्र सरकारपुरस्कृत, येऊ घातलेल्या कामगारविरोधी काळ्या कायद्यांपासून आणि नव-अस्पृश्यता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कंत्राटी-कामगारपद्धतीच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी, मुजोर कंपनी व्यवस्थापन व प्रस्थापित राजकीय व्यवस्थेशी सनदशीरमार्गाने संघर्ष करुया...**

'धर्मराज्य पक्ष'प्रणित

## 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ'

या कामगार संघटनेत सामील व्हा !!!



राजन राजे
(अध्यक्ष)





महेशसिंग ठाकूर
(महासचिव)
९७६९५ २५००६

रमाकांत नेवरेकर
(उपाध्यक्ष)
७२०८८ ७९१९७



**कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०**


Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (TITLE CODE : MAHMAR52590)